
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक १६२
www.ramprahar.com
शनिवार, २८ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

सौर कृषी पंप योजनेत देशात महाराष्ट्र प्रथम/२
अलिबागमधील प्रमुख मार्गांवर अवजड वाहनांना बंदी/५
यशस्वीचे शतक हुकले, तरीही केला खास पराक्रम/८

## कोकण रेल्वे मार्गावर विशेष रेल्वेगाडी धावणार



**मुंबई :** नववर्षाचे स्वागत करण्यासाठी कोकण, गोवा आणि दक्षिण भारतात जाणाऱ्यांची संख्या अधिक असल्याने नियमित रेल्वेगाड्यांचे आरक्षित तिकीट मिळणे कठीण झाले आहे. प्रवाशांची अतिरिक्त गर्दी विभाजित करण्यासाठी कोकण रेल्वे मार्गावर आरक्षित विशेष रेल्वेगाडी चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या हजरत निजामुद्दीन–तिरुवनंतपुरम सेंट्रल–हजरत निजामुद्दीन आरक्षित उत्सव विशेष रेल्वेगाडीला कोटा, रतलाम, वडोदरा, उधना, वसई रोड, पनवेल, रोहा, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, थिवि, मडगाव, कारवार, कुमटा, मुकांबिका रोड, बयंदूर, कुंदापुरा, उडुपी, मंगलोर, कासारगोड, कन्नूर, कोझिक्कोडे, शोरानूर, त्रिसूर, अलुवा, एर्नाकुलम टाउन, कोट्टायम, तिरुवल्ला, चेंगन्नूर, कायनकुलम, कोल्लम आणि वर्कला शिवगिरी येथे थांबा देण्यात आला आहे.

# रायगडात पर्यटकांचा ओघ; पोलीस दक्ष

### महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष पथके ■ समुद्रकिनाऱ्यांवर कडक बंदोबस्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

नाताळच्या सुट्ट्यांसह सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी व नववर्षाचे स्वागत करण्यासाठी रायगड जिल्ह्यात पर्यटक येऊ लागले आहेत. पर्यटकांच्या सुरक्षितेसाठी रायगड पोलिसांनी खबरदारी घेतली आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी विशेष पथक तयार करण्यात आली आहेत तसेच सर्व समुद्रकिनाऱ्यांवर कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे, अशी माहिती रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिली.



रायगड पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रातील २८ पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील हॉटेल, धाबे, कॉटेजेस्, फार्महाऊस येथे गैरकृत्य होणार नाही याकडे विशेष लक्ष देण्यात येणार आहे. दारू पिऊन धिंगाणा घालणे, दारूच्या नशेत वाहन चालवणे, गांजा, ड्रग्स इत्यादी अमली पदार्थांचे सेवन करणे, गैरवर्तन करणे यावर रोख लावण्याकरिता पोलीस पथके तयार करण्यात आली आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी अलिबाग, काशीद, नागाव, मुरूड, दिवेआगर, श्रीवर्धन, मांडवा तसेच इतर समुद्र किनाऱ्यांवर तसेच शहर व तालुक्यातील मुख्य बाजारपेठेत साध्या गणवेशातील पोलीस अंमलदार व महिला पोलीस अंमलदार यांचे पथक नेमण्यात आले आहे. समाजमाध्यमांवर कोणीही व्हिडीओ, फोटो, ऑडीओ क्लिपद्वारे आक्षेपार्ह पोस्ट करून दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावरही कडक कारवाई करण्यात येणार आहे.

जिल्ह्यात येणारी वाहने, फार्महाऊस, हॉटेल, लॉज्, पार्ट्यांची ठिकाणे, समुद्र किनारपट्टी येथे पोलीस ठाण्याकडील साध्या वेशातील पथके व स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकांमार्फत करडी नजर ठेवण्यात येणार आहे. (पान २ वर..)

**नववर्षाच्या स्वागतासाठी रायगड जिल्ह्यातील; त्याचप्रमाणे जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी सर्व खबरदारी घेत आहोत. नागरिकांनीदेखील पोलिसांना सहकार्य करावे. संशयित व्यक्तींवर नजर ठेवावी. आक्षेपार्ह वस्तू किंवा कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास तत्काळ नजीकच्या पोलीस ठाण्यास किंवा पोलीस नियंत्रण कक्ष येथे माहिती द्यावी.**
**–सोमनाथ घार्गे,**
**पोलीस अधीक्षक, रायगड**

# डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाने देशाचे खूप मोठे नुकसान

### पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वाहिली श्रद्धांजली



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनावर देशभरातून शोक व्यक्त होत आहे. केंद्र सरकारने सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. देशाने एक अभ्यासू अर्थतज्ज्ञ आणि मितभाषी व्यक्तीमत्व गमावल्याच्या भावना व्यक्त होताना दिसत आहेत. देशाचे विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ. सिंग यांना श्रद्धांजली देणारा संदेश जारी केला असून त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शनही घेतले.

पंतप्रधान मोदी आपल्या व्हिडीओ संदेशात म्हणतात, माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे आपल्या सगळ्यांनाच मोठे दुःख झाले आहे. त्यांचे आपल्यातून जाणे एक देश म्हणून आपले खूप मोठे नुकसान आहे. फाळणीच्या त्या काळात खूप काही गमावल्यानंतर भारतात येणे आणि इथे आयुष्याच्या प्रत्येक बाबतीत यश संपादन करणे ही सामान्य बाब नाही. कमतरता आणि संघर्षांमधून पुढे येऊन कशा प्रकारे नवी क्षितिजे गाठली जाऊ शकतात याची शिकवण त्यांचे जीवन भावी पिढीला देत राहील.

एका चांगल्या व्यक्तीच्या रूपात, विद्वान अर्थतज्ज्ञाच्या रुपात आणि सुधारणांच्या बाबतीत समर्पित नेत्याच्या रूपात त्यांना कायम स्मरणात ठेवले जाईल. पंतप्रधान म्हणून देशाच्या विकासात आणि प्रगतीमध्ये त्यांचे योगदान कधीही विसरता येणार नाही, अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी डॉ. सिंग यांनी विविध पदांवर राहून देशाच्या केलेल्या सेवेचा उल्लेख केला.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची ३४वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी झाली. या वेळी संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य आमदार प्रशांत ठाकूर यांचा विधानसभा निवडणुकीत सलग चौथ्यांदा निवडून आल्याबद्दल जाहीर सत्कार करण्यात आला.** **(वृत्त पान ३ वर..)**

# मातृभाषेत शिकूनही चांगली प्रगती होऊ शकते –लोकनेते रामशेठ ठाकूर

### ■ विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन; मंत्री आदिती तटकरे यांच्याकडूनही पाहणी

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

मातृभाषेत शिक्षण घेतल्यावरही आपली चांगली प्रगती होऊ शकते, असे प्रतिपादन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवे नोडमध्ये आयोजित विज्ञान प्रदर्शनावेळी केले. दरम्यान, या विज्ञान प्रदर्शनाला राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनीही भेट देऊन प्रदर्शनाची पाहणी केली व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.





पनवेल पंचायत समिती शिक्षण विभाग, गणित विज्ञान अध्यापक मंडळ आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या माध्यमातून ५२वे पनवेल तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन उलवे सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये करण्यात आले आहे. या विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान या विविध विषयांवर प्रकल्प सादर केले.

या प्रदर्शनाचे उद्घाटन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २७) झाले. प्रदर्शनाला मंत्री आदिती तटकरे यांनीही भेट देऊन पाहणी केली. **(पान २ वर..)**

## निवडक

### नाल्यात बस कोसळून आठ जणांचा मृत्यू, अनेक जखमी

**भटिंडा :** पंजाबमधील भटिंडा येथे शुक्रवारी (दि. २७) सकाळी झालेल्या एका भीषण अपघातात आठ जणांचा मृत्यू, तर अनेक जण जखमी झाले आहेत. एका खासगी कंपनीची बस नियंत्रण सुटून नाल्यात कोसळल्याने हा अपघात झाल्याचे सांगण्यात येत आहे. अपघातात जखमी झालेल्यांना पोलीस, प्रशासन आणि बचाव पथकांनी रुग्णालयात दाखल केले.

### टाटा ग्रुप आगामी पाच वर्षात देणार पाच लाख नोकऱ्या

**मुंबई :** टाटा ग्रुपचे चेअरमन एन. चंद्रशेखरन यांनी नववर्षानिमित्त टाटा ग्रुपच्या कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना एक पत्र लिहिले आहे. नववर्षानिमित्त लिहिलेल्या पत्रात त्यांनी आगामी पाच वर्षात पाच लाख रोजगारांची निर्मिती करण्याबाबत विचार करत असल्याचे म्हटले आहे. बॅटरी, सेमी कंडक्टर, इलेक्ट्रिक वाहने आणि सौर ऊर्जा क्षेत्रातील उपकरणे यामध्ये नोकऱ्या, कारखाने निर्मिती होणार आहेत. या नोकऱ्या सेवा क्षेत्राव्यतिरिक्त असतील.

# राज्यात अवकाळी पावसाची हजेरी

**नंदुरबार : प्रतिनिधी**

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजाप्रमाणे राज्यातील काही भागात शुक्रवारी (दि. २७) जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे शेती पिकांचे नुकसान होणार आहे. नंदुरबार आणि अकोला जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. इतर भागांमध्येही पावसाच्या सरी बरसल्या.



नंदुरबार जिल्ह्यातील काकळदा परिसरात शुक्रवारी दुपारी तुफान पाऊस झाला. अर्ध्या तासापासून जास्त वेळ झालेल्या या पावसामुळे रस्त्यावरून पाणी वाहू लागले. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची धावपळ उडाली. अकोला जिल्ह्यातही अवकाळी पावसाने हजेरी लावली. हवामान खात्याने पावसाबाबत आधीच अंदाज व्यक्त केला होता. त्यानुसार जळगाव, धुळ्यातही अवकाळी पाऊस पडला.

राज्यात हिवाळ्यात पडलेल्या अवकाळी पावसाचा फटका शेत पिकांना बसला आहे. या पावसामुळे रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे.

भारतीय हवामान विभागाने राज्यात २७ आणि २८ डिसेंबर असे दोन दिवस वादळ वाऱ्यासह अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. काही ठिकाणी पावसाचा यलो अलर्ट आहे, तर काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता व्यक्त आहे. त्यानुसार शुक्रवारी राज्यात अनेक ठिकाणी पाऊस झाला.

# पनवेलजवळील करंजाडे येथे शुद्ध पाण्याचा प्रकल्प




### माफक दरात सेवा; नागरिकांची भागणार तहान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नांदी व सनोफी फाउंडेशनच्या वतीने पनवेलजवळील करंजाडे येथे ग्रामपंचायतीच्या सहकार्याने आय प्युअर हा शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी (दि. २७) झाले.

स्वच्छ जल स्वस्थ कल ही संकल्पना राबवून नांदी फाउंडेशनच्या वतीने संपूर्ण देशभरात आय प्युअर हा प्रकल्प राबवण्यात येत आहे. करंजाडेमधील रहिवाशांना स्वच्छ पाणी मिळावे या उद्देशाने नांदी व सनोफी फाउंडेशनने करंजाडे येथे ग्रामपंचायतीच्या सहकार्याने हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. या ठिकाणी उभारण्यात आलेल्या प्लांटमधून अवघ्या आठ रुपयांमध्ये २० लिटर शुद्ध पाणी नागरिकांना उपलब्ध होणार आहे. त्यासाठी प्रथम एटीएमप्रमाणे कार्ड खरेदी करायचे आहे. या कार्डद्वारे २० लिटर पाणी मिळणार असून ही सेवा २४ तास उपलब्ध राहणार आहे. कार्डमधील पैसे संपल्यावर पुन्हा रिचार्ज करायचे आहे. एखाद्याकडे कार्ड नसल्यास त्याला १५ रुपयात एक लिटर पाणी मिळेल, तर जिल्हा परिषद शाळांना पाणी मोफत दिले जाणार आहे. या प्रकल्पामुळे दोन महिलांना नोकरीची संधीही मिळणार आहे. **(पान २ वर..)**

# माथेरानमध्ये डिसेंबरनंतरही ई-रिक्षा धावणार

### मुख्याधिकाऱ्यांची माहिती

**माथेरान : प्रतिनिधी**

डिसेंबरमध्ये ई–रिक्षाच्या पायलट प्रोजेक्टला सहा महिने पूर्ण होत असून यानंतर ही सेवा बंद होणार असल्याच्या अफवांना पेव आला आहे. या पार्श्वभूमीवर सर्व ई–रिक्षाचालकांनी मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या दालनात बैठक घेऊन याबाबत सविस्तर माहिती घेतली.



या वेळी मुख्याधिकारी इंगळे यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने सनियंत्रण समितीकडे या प्रोजेक्टबाबत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. सहा महिन्यांपूर्वी पायलट प्रोजेक्ट सुरू करताना माथेरानमधील रस्त्यावर ई–रिक्षा तीनही ऋतूत चालू शकतात का यासाठी हा प्रोजेक्ट कार्यान्वित करण्यात आला होता आणि तो डिसेंबरमध्ये पूर्ण होत आहे. असे असले तरी यानंतरही ई–रिक्षा सेवा सुरळीत सुरू राहील.

सनियंत्रण समितीने २० परवानाधारक हातरिक्षाचालकांना ई–रिक्षाची परवानगी दिली आहे. त्यांनी १० जूनपासून ई–रिक्षासेवा सुरू केली. या वर्षी माथेरानला मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. ६५५० मिमी इतक्या मुसळधार पावसातदेखील ई–रिक्षा बंद न पडता सुरळीत सुरू होत्या. हातरिक्षाचालकांनी बँकेतून कर्ज काढून ई–रिक्षा विकत घेतल्या आहेत. त्यामुळे दरमहिना कर्जाचे हफ्ते भरावे लागतात. हे लक्षात घेता मुख्याधिकारी यांच्यासोबतच्या भेटीत गावातील लोकप्रतिनिधी व स्थानिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

रिक्षा संघटनेचे सचिव सुनिल शिंदे यांनी सहा महिन्यांतील ई–रिक्षासेवेची सविस्तर माहिती दिली. ८६ हजार ८३४ प्रवाशांनी ई–रिक्षामधून प्रवास केला. दररोज २८४ विद्यार्थी व २३ शिक्षकांना ई–रिक्षाची सेवा दिली जाते. १३७ रुग्णांना बी.जे. रुग्णालयामध्ये जाण्यास सेवा दिली असल्याचे त्यांनी सांगितले. नागेश कदम व रूपेश गायकवाड यांनी उर्वरित ७४ हातरिक्षाचालकांना ई–रिक्षाची परवानगी देण्याची मागणी केली. हातरिक्षाच्या अमानवीय प्रथेतून मुक्ती हाच श्रमिक रिक्षा संघटनेचा उद्देश असल्याचेही स्पष्ट केले.

या वेळी माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, प्रदीप घावरे, प्रतिभा घावरे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजेश चौधरी, कुलदीप जाधव यांनी चर्चेत भाग घेतला व ई–रिक्षांची संख्या वाढविण्याची मागणी केली तसेच ई–रिक्षासेवा २४ तास उपलब्ध केली जावी हीदेखील प्रमुख मागणी केली.

या बैठकीस शिवसेना शाखाप्रमुख चंद्रकांत चौधरी, दत्ता सनगरे, चंद्रकांत जाधव, शैलेंद्र दळवी, प्रकाश सुतार, सुहासिनी दाभेकर, अर्चना बिरामने, प्रीती कळंबे आदी उपस्थित होते.

## पुण्यातील पर्यटकाचा काशीद येथील समुद्रात बुडून मृत्यू

**मुरूड : प्रतिनिधी**

सुट्ट्यांमध्ये मुरूड तालुक्यातील काशीद येथे आलेल्या पर्यटकांपैकी एक जणाचा समुद्रात बुडून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी (दि. २७) घडली. मयत व्यक्ती मुख्याध्यापक आहे.

पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील पिसोली येथील महात्मा ज्योतिराव हायस्कूलमधील ११ जणांचा समूह काशीद येथे फिरण्यास आला होता. यातील बहुसंख्य जण समुद्रात पोहण्यासाठी उतरले. या वेळी शाळेचे मुख्याध्यापक धर्मेंद्र देशमुख (वय ५६) खोल पाण्यात गेले. त्यांना जीवरक्षकांनी बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले, मात्र त्यांना मृत घोषित करण्यात आले. या घटनेचा अधिक तपास मुरूड पोलीस करीत आहेत.

# महालक्ष्मी सरस प्रदर्शनाने गर्दीचे सर्व विक्रम काढले मोडीत

### सुमारे २० कोटींची उलाढाल

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

उमेद अभियानाच्या महालक्ष्मी सरस २०२४ या भव्य दिव्य प्रदर्शनाची सांगता झाली. या प्रदर्शनाने नवी मुंबईच्या आतापर्यंतच्या सर्व प्रदर्शनांच्या गर्दीचे विक्रम मोडीत काढले. वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये भरलेल्या या प्रदर्शनात ग्रामीण महिलांच्या सर्व स्टॉल फूड कोर्टमधील विक्री साधारण १९ कोटी ८० लाख रुपये एवढी झाली.



ग्रामीण महिलांच्या कला आणि उत्पादनांना एक व्यावसायिक बाजारपेठ उपलब्ध करून देणारे हे प्रदर्शन नवी मुंबई येथे दुसऱ्यांदा आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे महाराष्ट्रातील महिला स्वसहाय्यता समूहांच्या आणि ग्रामीण कर्त्या कुटुंबांच्या विविध उत्पादनांसाठी एक समर्पित बाजारपेठ उपलब्ध करून देणे तसेच राज्यभरातील उत्पादनांची, विक्रीची आणि बाजारपेठांची माहिती समूह सदस्यांना देणे हे होते.

या प्रदर्शनाद्वारे शहरी नागरिकांना ग्रामीण आणि स्थानिक उत्पादनांचे तसेच खाद्यपदार्थांचे अनोखे अनुभव प्रदर्शनातून घेता आले. प्रदर्शनात दिसणारी उत्पादने विविध जिल्ह्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण ओळखीचे प्रतिनिधित्व करतात, ज्यामुळे नवी मुंबई व परिसरातील नागरिकांना उच्च दर्जाची आणि विश्वसनीय वस्तू आणि पदार्थांची खरेदी करता आली. याशिवाय प्रदर्शनात देशभरातील पारंपरिक चवी, कलात्मक शिल्पकला व विशिष्ट उत्पादनेदेखील होती. नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# देशात सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र प्रथम

## डिसेंबरमध्ये दररोज सरासरी ८४४ शेतकऱ्यांना लाभ

**मुंबई : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर पॅनेल्स आणि कृषी पंप असा संपूर्ण संच देण्याच्या ‘मागेल त्याला सौर कृषी पंप’ या योजनेच्या अंमलबजावणीला गती आली असून राज्यामध्ये महावितरणच्या माध्यमातून डिसेंबर महिन्यात दि. २६ पर्यंत २१,९५१ सौर कृषी पंप बसविण्यात आले, दररोज सरासरी ८४४ पंप बसविण्यात आले. ही आतापर्यंतची कोणत्याही महिन्यातील सर्वाधिक सरासरी आहे. अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या अंमलबजावणीवर भर दिला आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा दीर्घ काळाचा पेड पेंडिंगचा प्रश्न सोडविण्याचा निर्धार त्यांनी केला आहे.राज्यात २०१५ पासून २०२३ पर्यंत विविध योजनेत १,८०,००० सौर पंप बसविण्यात आले होते. तथापि, या वर्षी मार्च २०२४ पासून आतापर्यंत फक्त आठ महिन्यांच्या कालावधीत राज्यात १,५८,००० सौर पंप बसविण्यात आले आहेत. संपूर्ण देशात महाराष्ट्राने सर्वाधिक सौर पंप बसविण्याचा उच्चांक गाठला आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप या योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेच्या अंतर्गत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषी पंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो.

राज्य सरकारने फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती. राज्यात साडेदहा लाख सौर कृषी पंप बसविण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. त्यामुळे कृषी पंपासाठी पैसे भरून वीज कनेक्शनची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा पेड पेंडिंगचा प्रश्न सुटणार आहे.

मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेसाठी महावितरणने स्वतंत्र पोर्टलची निर्मिती केली आहे. शेतकऱ्यांनी पंपासाठी ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर महावितरणकडून अर्ज मंजूर केला जातो. त्यानंतर शेतकऱ्याने त्याचा हिस्सा भरायचा असतो. शेतकऱ्याकडून पंप बसविण्यासाठी एजन्सीची निवड केली जाते. पंप बसविण्याच्या ठिकाणाची महावितरण, एजन्सी व शेतकरी अशी तिघांकडून संयुक्त पाहणी केली जाते, त्यानंतर कार्यादेश दिला जातो आणि शेतात पंप बसविला जातो. पंप बसविणाऱ्या एजन्सीवर पुढच्या काळात देखभाल दुरुस्तीचीही जबाबदारी आहे. सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषी पंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीज पुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीज पुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

### चौक येथे वाहनतळावर काच फोडून चोरी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापुर तालुक्यातील चौक गावाच्या हद्दीत हॉटेलमध्ये नाश्ता करण्यासाठी थांबलेल्या पर्यटकाच्या कारची काच फोडून चाळीस हजार पाचशे रुपये किमंतीचा ऐवज चोरून नेल्याची घटना बुधवारी संध्याकाळी घडली. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला

पेण येथील कुटुंब खालापूर तालुक्यातील चौक येथील शिवाय हॉटेलमध्ये संध्याकाळी साडेचार वाजणेच्या सुमारास नाश्ता करण्यासाठी थांबले होते.

या वेळी चोरटयाने कारची काच फोडुन कार मधील बॅग मध्ये असलेले ४हजार रूपये रोख रक्कम व ३६हजार ५०० रूपये किंमतीचे सोन्याचे ब्रेसलेट व कागदपत्र चोरी करून नेले.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार पांडुरंग गभाले हे करीत आहेत.

# काळ व गोद नदीवरील पुलाचे बांधकाम संथगतीने

✽ महामार्गावरील वाहतूक कोंडी कायम



**माणगाव : प्रतिनिधी ,बातमीदार**

शहरातील काळ व गोद नदीवरील तसेच बायपास पूलाचे बांधकाम संथगतीने सुरू असल्याने वारंवार प्रवाशांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. या पुलाचे बांधकाम गेली ५ वर्षे कासवगतीने सुरू आहे.

मध्यंतरी हे काम निधीअभावी रखडले होते. मुंबई गोवा महामार्गाचे चौपदरीकरण काम तातडीने पूर्ण करण्यासाठी विविध संघटनांनी रस्त्यावर उतरून आंदोलन केले त्यामुळे या पुलाचे काम सुरू झाले आहे.

काळ नदीवरील पूल हा अरुंद असल्याने बाजारपेठ मधून जाणाऱ्या महामार्गाचे चौपदरीकरण अद्यापही झालेले नाही. त्यामुळे वाहतुकीची कोंडी वाढतच चालली आहे. बाजारपेठेतील अतिक्रमणे हटविण्यासाठी अनेक वेळा नोटीसा बजावल्या होत्या. मात्र अतिक्रमणे हटविली नसल्याने पादचाऱ्यांना चालणे देखील अवघड होऊन बसले आहे.

काळ नदीवरील या पुलाला १५३ वर्षे पूर्ण झाली आहेत. तरी पुल अजूनही भक्कमपणे उभा आहे.२००५ मध्ये या पुलाची डागडुजी करून ६ फुटांचे रुंदीकरण करण्यात आले.

नवीन पुलाचे बांधकाम २०१९ पासून सुरू झाले आहे. मात्र हे काम अर्धवट स्थितीत असल्याने गेली अनेक वर्षे प्रवाशांची रखडपट्टी होत आहे.सध्या या काळ नदीवरील पूलाच्या पिलरचे काम सुरू आहे.कोकणात गावी जाण्यासाठी कोकणवासीयांना हा एकमेव जवळील मार्ग बांधून झाल्यास पर्यटन, रोजगार, दळणवळण, व्यवसाय यांना चालना मिळू शकणार आहे.

# कालभैरव माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून वनराई बंधाऱ्याची निर्मिती

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत तालुक्यात कृषी विभागाने पाण्याची भूजल क्षमता वाढविण्यासाठी वनराई बंधारा बांधण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. किरवली येथील कालभैरव माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी त्यामध्ये सहभागी होउन कृषी विभागाचे मार्गदर्शनाने वनराई बंधारा बांधला. कृषी संशोधन केंद्राच्या भात संशोधन केंद्राचे अधिकारी आणि शास्त्रज्ञ यांनी देखील बंधाऱ्याची पाहणी करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले

कर्जत कृषी विभाग आणि कालभैरव माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने किरवली येथे वनराई बंधारा बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी जमले होते.या विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र बोराडे आणि तालुका कृषी अधिकारी राजाराम शिंदे यांचे हस्ते श्रीफळ वाढवून श्रमदनाला सुरुवात झाली. वनराई बंधाऱ्यासाठी श्रमदान करीत असलेल्या विद्यार्थांना कृषी विभागाकडून मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी कृषी विभागाचे मंडळ कृषी अधिकारी दिनेश कोळी, कृषी पर्यवेक्षक मंगेश गलांडे, कृषी सहाय्यक पंकज सोनकांबळे, कृषी सहायक पंकज सोनवणे यांनी विद्यार्थ्यांकडून वनराई बंधाऱ्याची निर्मिती करून घेतली. विद्यार्थ्यांनी श्रमदान करून बांधलेल्या बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साठले आहे .साधारण २५ मीटर लांबीचा हा बंधारा तयार झाला असून साधारण १०० मीटरहून अधिक अंतरापर्यंत पाणी साठा त्या बंधाऱ्यात झाला आहे. वसई येथील सुभाजित मुखर्जी फाऊंडेशन कडून कृषी विभागाला वनराई बंधारा बांधण्यासाठी रिकाम्या पिशव्या उपलब्ध करून देण्यात आल्या.

विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यासाठी प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रचे सहयोगी संचालक डॉ. भरत वाघमोडे ,विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, वनस्पती रोगशास्त्रज्ञ डॉ. पुष्पा पाटील, कनिष्ठ शरीरक्रिया शास्त्रज्ञ डॉ. मीनाक्षी केळुसकर, कनिष्ठ उद्यान विद्यावेत्ता डॉ. विजय दामोदर, कृषी सहायक किशोर सातकर तसेच मत्स्य उपकेंद्र तारापोरवाला, सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, पनवेलचे मत्स्यशास्त्रज्ञ डॉ. विवेक वर्तक, संशोधन अधिकारी डॉ. शशिकांत मेश्राम, सहयोगी संशोधन अधिकारी डॉ. भरत यादव, जीवशास्त्रज्ञ रवींद्र बोन्द्रे, महेश साळवी तसेच गुंज संस्थचे अक्षय जाधव यांनीही श्रमदान केलेले आहे. तसेच किरवली गावाचे पोलीस पाटील विवेक बडेकर हे पूर्णवेळ बंधारा बांधण्याच्या कामी सहकार्य करताना दिसत होते.

# विज्ञान प्रदर्शनात नाज अकॅडमी महाविद्यालयाचे यश

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील साळावच्या जिंदाल विद्यामंदिरात तालुका विज्ञान प्रदर्शनात मजगावच्या नाज अॅकॅडमी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी तयार केलेल्या प्रतिकृतीला प्रथम क्रमांक मिळाला. या प्रतिकृतीची निवड जिल्हा विज्ञान प्रदर्शनासाठी करण्यात आली आहे.

’वेस्ट मॅनेजमेंट ’असे या प्रतीकृतीचे नाव असून नाज महाविद्यालयातील सुफीया सिद्दी दामाद व सुश्मिता दास यांनी टाकाऊतून टिकाऊ प्रतिकृती तयार केली आहे. इयत्ता ९वी ते १२ या इंग्रजी माध्यमाच्या गटात वक्तृत्व स्पर्धेत सुफीया दामाद व सुश्मिता दास हीने निबंध लेखन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावले. त्यांना आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.



या प्रसंगी गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी व अन्य मान्यवर उपस्थित होते. या विद्यार्थीनींना विज्ञान शिक्षक प्रा. शहजान महंमद साजिद उलडे, शिक्षिका नौफ अन्सारी, मुस्कान हमदुले तसेच प्रयोगशाळा सहायक अलमास हबीब कोकाटे यांनी मार्गदर्शन केले. दोन्ही विद्यार्थीनींचा अकॅडमी संचालक मंडळ सदस्य शहाबाज तांडेल, सुफियान तांडेल, अहाद वसीम तांडेल यांच्या हस्ते बक्षीस देण्यात आले, तर मुख्याध्यापिका मेघा भंडारे, एचओडी प्रितम वाळंज, समन्वयक दिलशान दामाद आदींनी त्यांचे अभिनंदन केले.



**नवी मुंबई : भारताचे पहिले कृषीमंत्री व शिक्षणमहर्षी डॉ.भाऊसाहेब ऊर्फ पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिका मुख्यालयात ऑम्फिथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन झाले. या वेळी शिक्षणाधिकारी अरूणा यादव, विधी अधिकारी अभय जाधव, प्रशासकीय अधिकारी विलास मलुष्टे, रवी जाधव आणि इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.**

# विद्यार्थ्यांनी अंकुराप्रमाणे आपल्या कलांचा विकास करावा : मंगेश चितळे



**कळंबोली : बातमीदार**

शालेय जीवनातील स्नेहसंमेलनात कलागुणांचा निश्चितच विकास होत असतो .विद्यार्थ्यांनी कोणतीही भीती न बाळगता स्नेहसंमेलनात आपल्या कलेचे गुणदर्शन चांगल्या पद्धतीने करावे तरच जीवनात यशस्वी होता येईल. विद्यार्थ्यांनी अंकुराप्रमाणे आपल्या कलांचा विकास साधून विद्यालयाचे ही नाव उज्वल करावे असे असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांनी कळंबोली येथे केले.

सुधागड विद्या संकुलाचे स्नेहसंमेलनाचे उद्घाट्न पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता दीप प्रज्वलित करून करण्यात आले. यावेळी विद्यालयातील माजी विद्यार्थी व कल्याण डोंबिवली महापालिकेतील उपायुक्त वंदना गुळवे ,विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे , वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोथे ,महापालिकेतील माजी नगरसेवक विजय खानावकर,मराठी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वनिता कोळी, उप मुख्याध्यापक सुरेश शिंदे,इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका कल्पना कुलकर्णी , माजी मुख्याध्यापक पी एल गायकवाड, शिक्षण महर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालयाच्या प्राचार्य विलासिनी ठिगळे तसेच विद्यार्थी पालक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होता.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर केले .सलग पाच दिवस चालणार आहे. सुधागड विद्या संकुलात मराठी, हिंदी ,इंग्रजी ,उर्दू माध्यमाचे तब्बल १२००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पाचशे ते सहाशे कर्मचारी वर्ग विद्यालयात कार्यरत आहे. या सर्वांचे एकत्रित असे स्नेहसंमेलन विद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांनी अंकुर या शीर्षकाखाली आयोजित केले आहे.

पान १ वरुन

### रायगडात पर्यटकांचा ओघ; पोलीस दक्ष

अलिबाग रिलायन्स बायपास, पोयनाड ते पेझारी नाका, माणगाव मुख्य बाजारपेठ येथे वाहतूक नियोजनासाठी ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवून वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्याकरिता वापर करण्यात येणार आहे. १०९ पोलीस अधिकारी, ८७४ अंमलदार, ९२ वाहतूक, दोन आरसीपी प्लाटून, १०० होमगार्ड बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले आहेत.

वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये याकरिता मुख्य रस्ते तथा वाहतूक कोंडी होणारे ठिकाणे येथे वाहतूक पोलीस अंमलदार नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे मद्यपान करून वाहन चालविणाऱ्यांना चाप बसावा याकरिता ब्रेथ अनालायझरचा वापर केला जाणार असून मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कडक कारवाई केली जाणार आहे. यासाठी ९२ वाहतूक अंमलदारांची नेमणूक करण्यात आली असून १३ ब्रेथ अनालायझरव्दारे तपासणी करण्यात येणार आहे. ३८ नाकाबंदी पॉइंट, ११७ फिक्स पॉइंट, ११२ पेट्रोलिंग सेक्टर असा बंदोबस्त नेमण्यात आलेला आहे.

### मातृभाषेत शिकूनही चांगली प्रगती होऊ शकते –लोकनेते रामशेठ ठाकूर

या वेळी ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, प्रकल्पग्रस्तांचे नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, साईचरण म्हात्रे, सुदर्शन घरत, जयवंत देशमुख, किशोर पाटील, मिनाक्षी पाटील, भार्गव ठाकूर, विश्वनाथ कोळी, शिवदास कांबळे, चंद्रकांत घरत, प्राचार्य राज अलोनी आदी उपस्थित होते.

### पनवेलजवळील करंजाडे येथे शुद्ध पाण्याचा प्रकल्प

या कार्यक्रमास भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अनुसूचित जाती सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील, करंजाडे विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, उपाध्यक्ष नाथाभाई भारवड, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, वावंजे विभागीय अध्यक्ष प्रकाश खैरे, बिपीन गायकवाड, सूरज शेलार, प्रिया फडके, शिल्पा नागे, निशा गायकवाड, पूजा गायकवाड, नंदी फाउंडेशनचे मॅनेजर संतोष धुळगुडे, नागेश गोजे उपस्थित होते. या वेळी धुळगुडे यांनी या प्रकल्पाबाबत माहिती देत सात वर्षानंतर हा प्रकल्प ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

### माथेरानच्या दरीत आढळला मृतदेह

**माथेरान : प्रतिनिधी**

पर्यटनस्थळ असणाऱ्या माथेरानच्या खोल दरीत कुजलेल्या अवस्थेत मानवी मृतदेह आढळला आहे. ही व्यक्ती येथील डोंगर पायथ्याजवळ असणाऱ्या हाश्याची पट्टी आदिवासीवाडीतील पदू चांगो उघडा असल्याचे समोर आले आहे.

मयत पदू उघडा हा काही दिवसांपासून बेपत्ता होता. त्याला मानसिक आजार असल्याने तो वेड्यासारखे वागत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. पदू काही दिवसांपूर्वी माथेरानचा डोंगर चढत असताना काहींनी पाहिले होते. सुमारे सात ते आठ दिवसानंतर त्याचा मृतदेह खोल दरीत आढळला. उंच भागावरून पडून त्याचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज असून मृतदेह विच्छेदनासाठी कर्जत उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आला आहे. या घटनेबाबत अकस्मात मृत्यूची नोंद माथेरान पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

### चोळई येथे आज साईभंडारा

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कशेडी घाटाच्या सुरूवातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगतच्या चोळईतील साई प्रेरणा, मेढेकर फार्महाऊस येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील शनिवारी (दि.२८) साईभंडारा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सकाळी ६ वाजता अभिषेक व महापूजा, सकाळी १० वाजून ३० मिनीटांनी श्रीसाईंची आरती, सकाळी ११ वाजून ३० मिनीटे ते दुपारी ३ वाजेपर्यंत साईदर्शन व तीर्थप्रसाद तसेच महाप्रसाद (भंडारा) तसेच सायंकाळी ७ वाजता स्वरगंध युवा भजनी मंडळाचा सुश्राव्य कार्यक्रम असे दिवसभराचे आयोजन असून सर्व भाविकांनी या वेळी उपस्थित राहून तीर्थप्रसाद व महाप्रसादाचा (भंडारा) लाभ घेण्याचे आवाहन साईसेवक संतोष मेढेकर आणि मेढेकर परिवार तसेच ग्रामस्थ मंडळ भोगाव बुद्रुक यांनी केले आहे.

### दुखवटा

**प्रमोद ठाकूर**



**अलिबाग :** पंचायत समितीचे माजी सभापती प्रमोद ठाकूर यांचे गुरुवारी (दि. २६) सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे येथील रहिवासी असणारेप्रमोद ठाकूर यांनी राजकीय सामाजिक क्रीडा अशा विविध क्षेत्रात स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली होती. ग्रामपंचायत सरपंच पासून पंचायत समिती सभापती म्हणून त्यांनी जबाबदारी खंबीरपणे सांभाळली.

## निवडक

### कार-दुचाकी अपघातात एक जखमी

**पनवेल :** तालुक्यातील पाली ते लोणीवलीकडे जाणाऱ्या रस्त्यावर सकाळी दहाच्या सुमारास कार आणि मोटरसायकलचा भीषण अपघात झाला. या अपघातात मोटरसायकलवरील व्यक्ती गंभीर जखमी झाला आहे, तर दोन्ही वाहनांचे प्रचंड नुकसान झाले आहे. २६ डिसेंबर रोजी सकाळी दहाच्या सुमारास पाली ते लोणीवलीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोटरसायकल आणि चार चाकी कारचा अपघात झाला. या अपघातात मोटरसायकल वरील एक इसम जखमी झाला. पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या अपघातात मोटरसायकल आणि चारचाकी कारचे नुकसान झाले. अपघातातील जखमी इसमाची ओळख पटलेली नाही. अधिक तपास सुरू आहे.

### बेकायदा बॅनरप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** बस स्थानकाच्या समोर व आऊट गेटजवळ पनवेल महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता बॅनर लावून शहराचे विद्रुपीकरण केल्याबद्दल पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पनवेल महापालिकेचे प्रभारी अधिक्षक यांनी दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञात आरोपीने पनवेल महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता बॅनर लावून शहराचे विद्रुपीकरण करत असल्याचे दिसून आल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात देण्यात आली असून गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

# पनवेलमध्ये अतिक्रमणविरोधात जोरदार कारवाई

## अनधिकृत फेरीवाले, व्यावसायिक, नारळपाणी विक्रेत्यांवर बडगा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनधिकृतपणे रस्त्यांवर, फूटपाथवर अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांवर, व्यावसायिकांवर, खाद्य पदार्थ विक्रेत्यांवर, नारळपाणी विक्रेत्यांवर तसेच अनधिकृत बाजारांवरती आयुक्त मंगेश चितळे यांनी तोडक कारवाई तीव्र करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानूसार चारही प्रभागांमध्ये अतिक्रमणविरोधात जोरदार कारवाई करण्यात येत आहे.



यामध्ये दिनांक २६ गुरूवारी खारघर मधील डीमार्ट समोरील झोपडपट्टीवर कारवाई करून जेसीबीच्या साहाय्याने १२० झोपड्या तोडण्यात आल्या. या वेळी सहाय्यक आयुक्त स्मिता काळे, प्रभारी अधिक्षक जितेंद्र मढवी, सुरक्षा रक्षक, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

गुरुवारी कामोठ्यामध्ये सेक्टर ११मध्ये फूटपाथवर अतिक्रमण करून ठेवलेल्या साहित्यांवरती अतिक्रमण कारवाई करून सर्व सामान जप्त करण्यात आले तसेच सेक्टर ३४मध्ये रस्त्यावरती अनधिकृतरित्या उभारलेल्या खाद्यपदार्थांच्या स्टॉलवरती अतिक्रमण कारवाई करून सिलेंडर जप्त करण्यात आले.तसेच रस्त्यांवरती ठेवलेले दुकानांच्या बोर्डवरती कारवाई करून जप्त करण्यात आले. या वेळी सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर उपस्थित होते.

पनवेलमध्ये गुरूवारी सेक्टर१७ मध्ये जनार्दन भगत मार्ग येथे रस्त्यावर अनधिकृतरित्या सुरू असलेल्याआईसक्रिमच्या गाड्यांवरती कारवाई करून सामान जप्त करण्यात आले. तसेच फूटपाथवरील फुलविक्रते, फळविक्रेत्यांवरती कारवाई करून सामान जप्त करण्यात आले. तसेच साईनगरमध्ये रस्त्यावरती अतिक्रमण करून अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्यांवरती कारवाई करण्यात आली. पनवेलमधील नया नगर भागातील रस्त्यावर अनधिकृतपणे टपऱ्या बांधून व्यवसाय करणाऱ्यांवरती अतिक्रमण विभागाच्या वतीने कारवाई करून सामान जप्त करण्यात आले व टपऱ्यांवरती तोडक कारवाई करण्यात आली.

नवीन पनवेलमध्ये वाहतुकीस अडथळा आणणाऱ्या दोन हातगाड्या तोडण्यात आल्या व त्यांचा माल जप्त करण्यात आला. पनवेल प्रभागामध्ये विविध ठिकाणी रस्त्यांवर अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या नारळ पाणी विक्रत्यांवरती तसेच फळ विक्रेत्यांवरती अतिक्रमण विभागाच्या वतीने कारवाई करून फळे जप्त करण्यात आले, तसेच शुक्रवारी बेलपाडा गॅरेज लाईन परिसरात अनधिकृतरित्या रस्त्यावरती ठेवलेले सामान तसेच अनधिकृत फूटपाथवरील बोर्ड वर कारवाई करून सामान जप्त करण्यात आले.

नवीन पनवेलमध्ये शुक्रवारी फूटपाथवरील अनधिकृतरित्या व्यवसाय करणाऱ्या नारळ विक्रेते तसेच फळ विक्रत्यांवर कारवाई करून सामान जप्त करण्यात आले तसेच रस्त्यांवर वाहतुकीस अडथळा करून व्यवसाय करणाऱ्या फळ विक्री, भाजी विक्री करणाऱ्या गाड्यांवरती अतिक्रमण विभागाच्या वतीने तोडक कारवाई करण्यात आली.

# ‘जेबीएसपी’ची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची ३४वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि.२६) झाली.

या सभेत संस्थेच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली तसेच कार्यकारी मंडळाचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर यांचा विधानसभा निवडणुकीत सलग चौथ्यांदा निवडून आल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या सभेमध्ये संस्थेच्या विविध शाळांचा मिळालेल्या पुरस्काराबद्दल तसेच विविध स्पर्धा तसेच परीक्षांमध्ये उज्ज्वल यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात झालेल्या या सभेला संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, कृष्णाशेठ ठाकूर, सचिव एस.टी. गडदे, संचालक संजय भगत, वर्षा ठाकूर, वसंत पाटील, जगदीश घरत, हरिश्चंद्र पाटील, अमोघ ठाकूर यांच्यासह संस्थेचे पदाधीकारी आणि सदस्य उपस्थित होते.









# उरण वाहतूक पोलिसांतर्फे विशेष उपक्रम

**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरात ख्रिसमस दिनानिमित्ताने वाहतूक विभागाचे पोलिस उपायुक्त तिरुपती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली उरण वाहतूक शाखेतर्फे मोटरसायकल आणि चारचाकी वाहन धारकांनी सुरक्षित वाहन चालवावे, अपघात होऊ नये यासाठी सांताक्लॉजच्या वेषात रस्त्यावर उतरून जनजागृती केली. या वेळी उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी उरण शहरातील नाक्या नाक्यांवर चालकांना वाहतुकीच्या नियमांबाबत प्रबोधन केले.




वाहन चालविणाऱ्या नागरिकांनीही उरण शहरातील ठिकठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या वाहतूक पोलिसांच्या उपक्रमाला योग्य प्रतिसाद देत वाहतुकीचे नियमांना दाद दिली आहे. त्यामुळे वाहतूक पोलिसांकडून करण्यात आलेल्या अशा प्रकारच्या या उपक्रमांमुळे शहरातील वाहतूक सुरळीत व सुरक्षित होण्याला अधिक मदत होणार असल्याने येथील नागरिकांनी वाहतूक पोलिसांच्या विशेष उपक्रमाचे स्वागत केले असून, महिन्याच्या एखाद्या सप्ताहात असे उपक्रम राबविल्यास येथील वाहतूक व्यवस्था यापुढे अधिक सक्षम होईल, अशा प्रतिक्रिया उरण शहरातून व्यक्त होत आहेत.

# पनवेल परिसरातून सात बांगलादेशी ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर पोलीस ठण्याच्या हद्दीतील वेगवेगळ्या ठिकाणावरुन पनवेल शहर पोलिसांनी सात बांगलादेशीयांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात कारवाई केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि घेवडेकर, पोलीस उपनिरीक्षक अस्पतवार, पो.हवा.अमोल म्हात्रे, शैलेश जाधव, अभयसिंह पाटील आदींच्या पथकाने शहराजवळील साई वर्ल्ड सिटी कंन्स्ट्रक्शन साईड पळस्पे फाटा या ठिकाणावरुन सैफुल रशीद काझी (वय ५३), संपद मन्नान काझी (वय २५), मोनिउल नुरअली सरदर (वय २७) यांच्यासह पनवेल रेल्वे स्टेशनच्या मुख्य गेटच्या बाहेरील मोकळ्या मैदानात कच्च्या झोपडीमध्ये इबादुल अफजल शेख (वय ३८), मिथुन कौसर शेख (वय ३०) त्याचप्रमाणे भिंगारीपाडा मराठी शाळेजवळून रिपोन शेख (वय २८), शेमुल शेख (वय २६) अशा सात जणांना मोबाईलसह ताब्यात घेवून त्यांच्याविरोधात कारवाई करण्यात आली आहे.

> **गेल्या काही दिवसापासून पनवेल परिसरात बेकायदेशीररित्या बांगलादेशीय वास्तव्यास असून त्यांच्या विरोधात धडक कारवाई सुरू आहे. तरी अशा परकीय नागरिकांना आपली जागा, दुकाने भाडेतत्वावर देवू नये व त्या संदर्भातील माहिती संबंधित पोलीस ठाण्यात द्यावी.**
>
> **-वपोनि नितीन ठाकरे**

# वेअर हाऊसमधील चोरीप्रकरणी महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती

**पनवेल : वार्ताहर**

जवळपास पाच कोटी रुपये किंमतीच्या सुपारी व मिरीच्या मालाची तेथील सुरक्षा रक्षकांना धमकावून अज्ञात टोळीने चोरी केल्याची घटना पनवेल तालुक्यातील शिरढोण येथील आशेरा वेअर हाऊस येथे घडली होती. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी कसून शोध सुरू केला असताना महत्त्वाचे धागेदोरे त्यांच्या हाती लागले असून त्यांनी या प्रकरणी काही जणांना ताब्यात सुद्धा घेतले आहे.

आशेरा वेअर हाऊस शिरढोण येथील आलसेन शिपींग अ‍ॅण्ड लॉजिस्टीक्स प्रा.लि. कंपनीच्या गाळ्यामध्ये कस्ट विभागाकडून कस्टम ड्युटी न भरलेला तीन कंपनींच्या सुपारी व मिरी असा माल ठेवलेला असताना त्या ठिकाणी एक ट्रेलर कंटेनरसह व चार लहान ट्रकसह सुमारे ३० ते ३५ व्यक्तींनी तेथे येवून त्यांच्यापैकी एका व्यक्तीने तेथील सुरक्षा रक्षकास चाकू दाखवून जीवे मारण्याची धमकी देवून त्याच्या व त्याच्या सहकाऱ्यांनी सदर सुरक्षा रक्षकाचे की हातपाय बांधले तसेच दुसऱ्या सुरक्षारक्षकाला सुद्धा जीवे मारण्याची धमकी देवून त्याच्याकडे असलेल्या कटर मशिनच्या सहाय्याने गाळ्याच्या शटरला असलेली कुलूपे तोडून आत प्रवेश करून जवळपास पाच कोटी रुपये किंमतीच्या सुपारी व मिरी हा माल व सुरक्षा रक्षकाचा एक मोबाईल असा चोरून नेवून ते पसार झाले आहेत.

या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. या तक्रारीनंतर वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे विविध पथके या आरोपींचा तांत्रिक तपास गुप्त बातमीदार व सीसीटीव्ही फुटेजद्वारे शोध घेत असताना महत्वाचे धागेदोरे त्यांच्या हाती लागले असून त्या अनुषंगाने त्यांनी काही जणांना ताब्यात घेतले आहे व त्यांच्याकडे केलेल्या कसून चौकशीत पुढील दिशा मिळाली असून लवकरच या गुन्ह्याची उकल होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.



### नांदा सौख्य भरे!

**पनवेल : भाजप युवा मोर्चा विधानसभा संयोजक रोहित जगताप यांच्या विवाहानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत वधू-वरास आशीर्वाद दिले.**



**उलवे नोड : येथील सिडको अभियंता मनोज वाळिंबे यांच्या जागी गिरीश जोगदंड यांची नियुक्ती झाली आहे. त्याबद्दल भाजप पदाधिकाऱ्यांनी दोघांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, अवधेश महतो, उत्तम चिकने, अर्चना चौहान, देवालय मित्र, प्रकाश मुंढे आदी उपस्थित होते.**

# आपल्याला मुलांचे भविष्य सुरक्षित करायचेय -देवकीनंदन महाराज

**खारघर : रामप्रहर वृत्त**

कथाकार देवकी नंदन ठाकूर महाराज म्हणाले की, सनातन मंडळाची स्थापना अत्यंत महत्त्वाची आहे. आपल्या मुलांचे भविष्य आपल्याला सुरक्षित करायचे आहे. सनातन मंडळ आपली संस्कृती, परंपरा आणि धार्मिक मूल्ये जपण्यास मदत करेल. देवकीनंदन ठाकूर यांनी खारघर येथील कॉर्पोरेट पार्क मैदानावर सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथेदरम्यान व्यक्त केले. दरम्यान या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांनीही देवकी नंदन ठाकूर महाराजांचे दर्शन घेतले.



ते म्हणाले की, जेव्हा आपण साधू-संतांच्या सहवासात राहतो तेव्हा आपला आत्मा शुद्ध होतो. देवकीनंदन ठाकूर महाराज यांनी कथेत सांगितले की, शरीर निरोगी ठेवण्यासाठी जसे आपण पौष्टिक आहार घेतो, त्याचप्रमाणे आत्म्याच्या शुद्धीसाठी सत्कर्म आणि सत्संग आवश्यक आहे. जेव्हा आपण चांगले कार्य करतो आणि संतांच्या सहवासात राहतो तेव्हा आपला आत्मा शुद्ध होतो.

महाराज म्हणाले, आपल्या मुलांना संस्कार आणि संस्कारांचे योग्य शिक्षण दिले पाहिजे. आपल्या मुलांना रामायण आणि गीता शिकवून उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरित करणे ही आम्हा सनातन्यांची जबाबदारी आहे.

ज्यांना आपल्या जीवनात समृद्धी हवी आहे त्यांनी प्रयागराज येथे होणाऱ्या महाकुंभात कल्पवास करावा. महाकुंभात कल्पवास केल्याने केवळ शरीर आणि मन शुद्ध होत नाही तर आत्म्यालाही दिव्य अनुभूती मिळते. ही श्री मद्भागवत कथा २४ डिसेंबरपासून सुरू होत असून ती ३० डिसेंबरपर्यंत चालणार आहे. ३१ डिसेंबर रोजी नवीन वर्ष धार्मिक विधींनी साजरे केले जाणार आहे.

# करंजाडे येथे रंगोत्सव उत्साहात साजरा

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे येथे राजमाता जिजाऊ जयंती सोहळ्यानिमित्त चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवराय आणि राजमाता जिजाऊ यांचा जीवनपट विद्यार्थ्यांनी आपल्या चित्रांमधून रेखाटला.

अक्षर ग्लोबल स्कूलचे संस्थापिका सुदेशना मॅडम, पीएनएस अ‍ॅकॅडमीच्या संस्थापिका सारिका अंबारे, नागे दांपत्य ग्रामपंचायत सदस्य करंजाडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. संपदा सावंत, प्रिती सावंत, भारती पानपट, पल्लवी एरंडे, छाया भोसले, अर्चना गुंड शुभांगी घायाळ यांनी संकल्प शैक्षणिक, सामाजिक संस्थेच्या संस्थापिका वैशाली जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली विशेष परिश्रम घेतले. स्पर्धा यशस्वी करेण्यासाठी विजय कणसे, अमोल घायाळ, संजय दिवटे आणि राजेंद्र आवारी यांचे सहकार्य लाभले.



# कळंबोलीतील तुंबलेल्या नाल्याची समस्या मार्गी

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ३ मधील तुंबलेल्या नाल्याबाबतची तक्रार पत्रकार दीपक घोसाळकर यांनी पनवेल महापालिकेकडे केली होती. पालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली तत्काळ या समस्येची दखल घेण्यात आली. याबद्दल धन्यवाद देण्यात आले आहेत.



कळंबोली वसाहती मधील सेक्टर ३च्या रस्त्यालगत असणारा मोठा नाला हा गेले दहा ते पंधरा दिवसांपासून तुंबलेल्या अवस्थेत होता. त्यातील मलमिश्रित पाणी हे नाल्यात साठवून बाहेर रस्त्यावर येत होते. मलमिश्रित पाण्याचा त्रास हा पादचारी वाहनचालक व येथील नागरिकांना होत होता. या बाबतची माहिती व तक्रार फोटो व छोटासा व्हिडिओ काढून घोसाळकर यांनी आयुक्त चितळे यांच्याकडे बुधवारी केली.

व्हॉट्सअ‍ॅपद्वारे केलेली तक्रारची दखल ताबडतोब घेऊन कळंबोलीतील विभागाधिकारी व स्वच्छता दूतांकडून सदरच्या नाल्यावरील झाकणे काढून दुपारी एक वाजता नाल्यात अडकलेल्या प्लास्टिकचे तुकडे घाण, प्लास्टिकच्या बाटल्या व अन्य गाळ काढून सदरचा नाला हा पूर्ववत वाहता केला. त्यामुळे येथील रस्त्यावर साचलेले पाण्याचाही त्वरित निचरा झाला.

या साचलेल्या पाण्यामुळे येथे असलेले दुकान चालक व रहिवाशांना चांगलाच त्रास होत होता, परंतु सोशल मीडियाद्वारे केलेल्या तक्रारीची गंभीर दखल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे आणि त्वरित घेतल्यामुळे येथील नागरिकांनी समाधान व्यक्त करून महापालिकेला व आयुक्त मंगेश चितळे यांना धन्यवाद दिले आहेत.

## संपादकीय

# प्रदूषण कितपत गंभीर?

मुंबईमध्ये दिल्लीइतकी प्रदूषणाची वाईट परिस्थिती निर्माण झालेली नाही हे खरेच आहे, पण तरी दिल्लीच्या प्रदूषित हवेच्या बातम्या सारख्या कानावर पडत असल्यामुळे की काय, हवेतील वाढलेल्या धुरक्याविषयी मुंबई व आसपासच्या परिसरातील लोक धास्तावले आहेत. मुंबई महापालिकेकडून प्रदूषण नियंत्रणाविषयी सातत्याने खबरदारी घेतली जाते आहे, परंतु थंडीचा काळ सुरू झाल्याने हवेत प्रदूषके साचून राहण्याचे प्रमाण वाढलेले दिसते.

**मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावली असून गुरुवारी व शुक्रवारी दिवसभर मुंबईमध्ये धुरक्याचे साम्राज्य होते. विशेषत: सकाळच्या वेळेत हवेतील धुलीकण डोळ्यांनीही दिसत असल्याने मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेले दक्षिण मुंबईतील नागरिक धास्तावले. दिवसभर तेथील काही भागांमध्ये दाट धुरके होते तर आझाद मैदान, ओव्हल मैदान आदी भागांत समोरच्या इमारतीही दिसत नव्हत्या. हा धुक्याचा परिणाम की हे प्रदूषणामुळे निर्माण होणारे धुरके याविषयीची चर्चा त्यामुळे माध्यमांमध्ये सुरू झाली. तसा मुंबईतील हवेचा दर्जा नोव्हेंबरपासूनच खालावला असून दिवाळीच्या फटाक्यांनंतर त्यात आणखी घसरण झाली. तेव्हापासूनच मुंबईतील काही भागांमध्ये हवा सातत्याने 'वाईट' ते 'अतिवाईट' या श्रेणींमध्येच नोंदली जाते आहे. यात दक्षिण मुंबईसोबतच देवनार, शिवाजी नगर तसेच बोरिवली आदी भागांचा समावेश आहे. गेल्या महिनाभरात या भागांमध्ये जवळपास १५ दिवस हवा 'अतिवाईट' तर उर्वरित दिवस 'वाईट' श्रेणीत नोंदली गेली आहे. अनेकांनी त्यामुळे कोरोना काळापासून सवयीच्या झालेल्या मास्कचा वापर पुन्हा सुरू केला आहे. काहींना डॉक्टरांनीही खबरदारीची सूचना केली आहे. फ्ल्यूसारख्या लक्षणांच्या, दम्याच्या व श्वासनलिकेशी संबंधित रुग्णांच्या संख्येत जवळपास ५० टक्क्यांनी वाढ झाल्याचे नामांकित डॉक्टर सांगतात. सर्दी–खोकला झाला तरी औषधे घेऊनही अनेक दिवस आराम पडत नाही हे चित्र नोव्हेंबरअखेरीपासूनच मुंबई व परिसरात दिसते आहे. त्यामुळेच लोक वाढत्या प्रदूषणाविषयी चिंतेत आहेत. नुकतीच मुंबई महापालिकेकडून वायू प्रदूषण नियंत्रणासाठीच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी नेमकी कशी होते आहे याची तपासणी सर्व वॉर्डांमध्ये करण्यात आली. बुधवारपर्यंत सर्व वॉर्डांतील ८६८ बांधकाम प्रकल्पांची पाहणी करण्यात आली व प्रदूषण नियंत्रण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बांधकामांना लेखी सूचना देण्यात आल्या. याउप्परही नियमांचे पालन न झाल्यास काम थांबवण्याचा इशाराही पालिकेने या प्रकल्पांना दिला आहे. वास्तविक दरवर्षी थंडीमध्ये मुंबई व आसपासच्या परिसरात अशीच परिस्थिती निर्माण होते. वाऱ्याचा वेग कमी झाल्याने प्रदूषके साचून राहतात. पण अर्थातच संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात वाढलेले बांधकामांचे प्रमाण, मोठ्या प्रकल्पांची कामे, वाहतूक कोंडी या समस्यादेखील हवेच्या प्रदूषणात भरच घालत आहेत याकडे तज्ज्ञांनीही लक्ष वेधले आहे. गेल्या दोन–तीन दिवसांपासून मुंबईतील तापमानात घट झाल्यामुळे धुक्याचे प्रमाणही वाढले. सध्या मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेचा निर्देशांक हा १५०च्या पुढे असल्याने जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमाणकांनुसार हा निर्देशांकही आरोग्याला घातकच असल्याचे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. प्रकल्पांची कामे, रस्तादुरुस्तीसाठी केली जाणारी खोदकामे व पुनर्विकास प्रकल्पांमुळे वाढलेले बांधकामांचे प्रमाण या साऱ्यांच्या एकत्रित परिणामांमुळे प्रदूषकांचे हवेतील प्रमाण वाढते आहे का याचा आढावा घेण्याची गरज असून किमान थंडीच्या या काळात त्यातील काही कामे रोखून प्रदूषणाचे अधिक प्रभावी नियंत्रण करता येईल का की, अन्य काही उपाययोजना कराव्या लागतील याचा विचार होण्याची गरज दिसते आहे.**

# पर्यटकांचे आकर्षण तळा तालुक्यातील कुडा लेणी




मुंबईपासून १६० किमी व मुंबई – गोवा राष्ट्रीय महामार्गापासून इंदापूर येथून अंदाजे २६ किमीवर कुडा हे गाव आहे. येथील समुद्र किनाऱ्याजवळील पहाडावर २६ कोरीव लेण्या कोरलेल्या आहेत. लेण्यांपर्यंत जाण्याकरिता मुंबई–गोवा महामार्गापासून इंदापूर ते तळा व तळावरून कुडा एसटी बस किंवा खाजगी वाहनाने जात येते. त्याचप्रमाणे मुरूड येथून देखील कुडा येथे एसटी बस किंवा खासगी वाहनाने जात येते.

या लेण्या सन १८४८ साली पुरातत्व विभागात नोंदणी झालेली आहे. या लेण्या सातवहन काळातील बुद्ध लेण्या आहेत. पूर्वीच्याकाळी तळा तालुक्यातील मांदाड हे प्रसिद्ध बंदर होते. रोमन साहित्यात मांदाड या गावाचे नाव मेंडा गोरा बंदर असे होते. हि लेणी दोन भागामध्ये कोरलेली आहे. १ ते १५ लेण्या खालील भागात आहेत. व १६ ते २६ लेण्या १० फूट वरच्या भागात आहेत. बौद्ध धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी लेणी कोरण्यात आली असावी. कारण या लेण्यांमध्ये सुंदर बौद्ध मूर्ती सापडते. तसेच या लेण्यांमध्ये ४ चैत्य गृह आहेत. आसपास सुंदर निसर्ग निर्मित असल्यामुळे पर्यटकांना त्या लेण्या आकर्षित करीत आहेत. लेण्यांवर चढल्यानांतर येथून अरबी समुद्राचे नितांत रम्य दर्शन होते. इ.स.तिसऱ्या शतकात या लेण्यांचा बांधकाम झाला आहे. सन १८४८ नंतर सुद्धा या लेण्या फारशा प्रसिद्ध नव्हत्या. कारण त्यावेळी लेण्यांकडे जाण्याकरिता दळणवळणाची साधने उपलब्ध नव्हती.

हि सर्व लेणी बौद्धांच्या हीनयान पंथाशी संबंधित आहेत. येथील भिंतींवर आणि खांबांवर शिलालेख कोरलेले आहेत व त्यावर दान देणाऱ्या लोकांची नावे कोरलेली आहेत. हि शिल्पे कार्ले येथील लेण्यांच्या शिल्पासारखीच आहेत. कुडा लेणीपर्यंत पोहचण्यासाठी तळा येथून बसने कुडा येथे उतरणे व नंतर १० ते १५ मिनिट चालावे लागते तसेच कोकण रेल्वेच्या रोहा स्टेशनपासून २४ किमी प्रवास करून लेण्यांपर्यंत पोहचता येते. तर माणगाव रेल्वेस्टेशन येथून ३५ किमी प्रवास करून लेण्यांपर्यंत पोहचता येते. कुडा लेणी यांना भेट देण्यासाठी दरवर्षी हजारो पर्यटक येत असतात. यामध्ये मुंबई तसेच पश्चिम महाराष्ट्र व परदेशी पर्यटकांचा सहभाग आहे. निसर्ग रम्य अशा कोकणात झाडी आणि डोंगरामध्ये कुडा लेणी असून ती फारच सुंदर दिसत आहेत. पर्यटकांनी या लेण्याला भेट देऊन सातवहन काळ किती प्रगल्भ व सुधारित याचा अभ्यास करावा. ज्यामुळे तळा बाजारपेठेला उत्पन्नाचे साधन होईल. या कुडा लेणीमुळे रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्याचे नाव सर्वदूर पोहचले आहे.

**–सलीम शेख,** माणगाव

# उद्योगपती धीरूभाई अंबानी



धीरजलाल हिराचंद अंबानी (धीरूभाई अंबानी) हे एक प्रसिद्ध भारतीय उद्योगपती होते ज्यांनी रिलायन्स इंडस्ट्रीची स्थापना केली. त्यांचे शिक्षण फक्त हायस्कूल पर्यंत झाले होते, पण त्यांच्या दृढ निश्चयाद्वारे त्यांनी स्वतःचे व्यापारीक आणि औद्योगिक साम्राज्याची स्थापना केली होती.

फक्त तीन दशकांमध्ये त्यांनी आपल्या छोट्याशा व्यवसायाला एका मोठ्या औद्योगिक कंपनीच्या स्वरूपात घडवले. त्यांचा जन्म २८ डिसेंबर १९३२, चोरवड, जुनागड इस्टेटमध्ये झाला. त्यांनी फक्त भारतातच नाही तर आंतरराष्ट्रीय बाजारामध्येसुद्धा रिलायन्स एक मोठी कंपनी म्हणून अस्तित्वात आणली. त्यांची अफाट जोखीम घेण्याची क्षमता आणि अचूक वृत्तीने त्यांना फोर्ब्सच्या श्रीमंत व्यक्तींच्या यादीत स्थान दिले. आपल्या आर्थिक कौशल्यांनी धीरूभाई अंबानी यांनी वात्सव मध्ये एक शेअर बाजार बनवले. वर्ष २०२२ च्या एका डेटा मध्ये रिलायन्स कंपनी टॉप '१०० फॉर्च्यून' या कंपन्यांमधून एक होती. धीरूभाई यांनी रिलायन्सचे १९७७ मध्ये सार्वजनिक क्षेत्रात समावेश केले आणि २००७ मध्ये त्यांची दोन्ही मुले अनिल आणि मुकेश यांची संयुक्त संपत्ती जवळपास १०० मिलियन डॉलर होती. या अफाट संपत्तीने अंबानी परिवाराला संपूर्ण विश्वामध्ये श्रीमंत परिवार बनवले.

धीरजलाल हिरालाल अंबानी अथवा धीरूभाई अंबानी यांचा जन्म २८ डिसेंबर १९३२ ला गुजरातच्या जुनागड जिल्ह्यामध्ये चोरवाड गावाच्या एका सामान्य मोध बनिया परिवारात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव हिराचंद गोर्धनभाई अंबानी आणि आईचे नाव जमनाबेन होते. त्यांचे वडील शिक्षक होते. आपल्या आई वडिलांच्या पाच मुलांमधून धीरूभाई हे तिसरे होते. त्यांचे दुसरे भाऊ बहीण होते रमणिकलाल, नटवर लाल, त्रिलोचना आणि जसुमती. आर्थिक टंचाईमुळे त्यांना हायस्कूल मध्येच शिक्षण सोडावे लागले. परिवाराची आर्थिक मदत करण्यासाठी त्यांनी भजी पावचे दुकान टाकले जे फक्त इथे येणाऱ्या पर्यटकांवर अवलंबून होते.

१९४८मध्ये सोळा वर्षांचे असताना ते आपले मोठे भाऊ रमनिकलाल यांच्या मदतीने यमन च्या एडेन शहरात पोहचले. तेथे त्यांनी 'ए. बेस्सी आणि कंपनी' सोबत तीनशे रुपये प्रतिमहाच्या वेतनावर काम केले. जवळपास दोन वर्षांनंतर 'ए. बेस्सी आणि कंपनी' जेव्हा 'शेल' नामक कंपनीच्या उत्पादनांचे वितरक बनले तेव्हा धीरूभाईंना एडन बंदरावर कंपनीच्या फिलिंग स्टेशनच्या व्यवस्थापकाची नोकरी मिळाली.

१९५०च्या दशकात धीरूभाई अंबानी यमन मधून भारतात परतले आणि आपले चुलत भाऊ चंपकलाल दमानी (ज्यांच्या सोबत ते यमनमध्ये राहत होते.) त्यांच्यासोबत मिळून पॉलीस्टर धागे आणि मसाल्यांचे आयात निर्यातीचा व्यापार सुरू केला. रिलायन्स कमर्शियल कॉर्पोरेशनची सुरुवात मस्जिद बंदरच्या नरसिमा स्ट्रीट वर एका छोट्याशा कार्यालयापासून झाली. यादरम्यान अंबानी आणि त्यांचा परिवार मुंबईच्या भुलेश्वर स्थित 'जय हिंद इस्टेट' मध्ये एका छोट्या आपारमेंट मध्ये राहत होता.

वर्ष १९६५ मध्ये धीरूभाई अंबानी आणि चंपकलाल दमानी यांची व्यावसायिक भागीदारी समाप्त झाली. दोघांचे स्वभाव आणि व्यापार करण्याची पद्धत वेगळी होती त्यामुळे ते भागीदारी जास्त वेळ टिकवू शकले नाही. दमाणी हे सावध व्यावसायिक होते, तर धीरूभाई हे जोखीम घेणारे व्यावसायिक मानले जात होते.

आत्तापर्यंत धीरूभाई अंबानीला वस्त्र व्यवसायाची चांगली समज आली होती. या व्यवसायामध्ये चांगली समज असल्यामुळे त्यांनी वर्ष १९६६ मध्ये अहमदाबादच्या नरोडा मध्ये एका कपडा मिलची स्थापना केली. तेथे वस्त्र निर्माण मध्ये पॉलिस्टरच्या धाग्यांचा वापर झाला आणि धीरूभाईंनी 'विमल' ब्रँड ची सुरुवात केली जे की त्यांचे मोठे भाऊ रमणीकलाल अंबानी यांचे सुपुत्र विमल अंबानी यांच्या नावावर ठेवले गेले होते. त्यांनी 'विमल' ब्रँडची जाहिरात केली की, भारताच्या अंतर्गत भागातही हा ब्रँड घरोघरी प्रसिद्ध झाला.१९७५मध्ये जागतिक बँकेच्या तांत्रिक पथकाने रिलायन्स टेक्सटाइल्सच्या उत्पादन युनिटला भेट दिली आणि ते विकसित देशांच्या मानकांनुसार उत्कृष्ट असल्याचे आढळले.

धीरूभाई यांना इक्विटी कल्ट ला भारतात सुरू करण्याचा श्रेय पण जाते. जेव्हा १९७७ मध्ये रिलायन्स ने आयपीओ (खझज)चालू केले तेव्हा ५८,००० पेक्षा जास्त गुंतवणूकदारांनी गुंतवणूक केली. धीरूभाई गुजरात आणि इतर राज्यांतील ग्रामीण जनतेला आश्वासन देण्यात यशस्वी झाले की ज्यांनी त्यांच्या कंपनीचे शेअर्स विकत घेतले त्यांना त्यांच्या गुंतवणुकीवर फक्त लाभच मिळेल.

आपल्या जीवन काळामध्ये धीरूभाई यांनी रीलाईन्सच्या व्यवसायाचे वित्सार विविध क्षेत्रांमध्ये केले होते. यामध्ये प्रामुख्याने पेट्रोकेमिकल्स, दूरसंचार, माहिती तंत्रज्ञान, ऊर्जा, वीज, किरकोळ कपडे/वस्त्र, पायाभूत सेवा, भांडवली बाजार आणि लॉजिस्टिक यांचा समावेश होता. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# महत्त्वाची कागदपत्रे झटक्यात करा स्कॅन

स्मार्टफोन दैनंदिन जीवनातील एक महत्त्वाचा भाग ठरला आहे. नोकरीवर रुजू होताना किंवा एखाद्याला महत्त्वाची कागदपत्र तात्काळ पाठवायची असतील तर स्कॅन करून मगच पाठवावे लागतात. यासाठी स्मार्टफोनमधील अनेक ॲप्स आपल्याला उपयोगी पडतात. पण, प्ले स्टोअरवर हे ॲप्स सर्च करताच तुमच्यासमोर एक यादी दिसेल. मग या ॲपमधील नक्की कोणता योग्य आहे हे ठरवण्यात आपल्या सगळ्यांचीच तारांबळ उडते. पण, आता तुम्हाला चिंता करण्याची गरज नाही, कारण व्हॉट्सप तुमच्यासाठी एक खास गोष्ट घेऊन आला आहे.




होय, व्हॉट्सपने स्वतःचे स्कॅनर फीचर आणण्याची योजना आखली आहे. थ–इशींरखपषी च्या मते, मेसेजिंग प्लॅटफॉर्म आपल्या नवीन फीचर्ससह डॉक्युमेंट स्कॅन करणे सोपे करणार आहे. नवीन फीचर तुम्हाला ॲपमध्ये थेट कागदपत्रे स्कॅन करण्यास अनुमती देईल. सध्या हे नवीन फीचर काही युजर्ससाठीच उपलब्ध आहे आणि तुम्हाला हे अपडेटसाठी नवीन व्हर्जन सापडेल. व्हॉट्सपमध्ये मिळणाऱ्या नेहमीच्या शेअरिंग पर्यायामध्ये हे फीचर जोडले जाईल.

१. सगळ्यात पहिले व्हॉट्सप उघडा.
२. आता डॉक्युमेंट शेअरिंग पर्याय निवडा.
३. पुढे तुम्हाला 'कॅमेरा' पर्याय निवडावा लागेल.
४. कॅमेरा उघडल्यानंतर तुम्हाला स्कॅनचा पर्याय दिसेल.
५. आता डॉक्युमेंट स्कॅन करा आणि तुम्हाला पाहिजे तसे ॲडजेस्ट करा.
६. डॉक्युमेंट एडिट करून झाल्यानंतर तुम्ही तो थेट चॅट किंवा ग्रुपवर पाठवू शकता.

हे फीचर डॉक्युमेंट कसे आणि कुठून क्रॉप करावे यासाठीदेखील सूचना देईल. या व्यतिरिक्त तुम्हाला कॉन्ट्रास्ट आणि ब्राईटनेससुद्धा ॲडजेस्ट करण्यात मदत करेल. आयओएस अपडेटचा भाग म्हणून या फीचरची माहिती दिली आहे. स्कॅनरची गुणवत्ता चांगली असेल. तुम्ही स्कॅन करून पाठवलेले डॉक्युमेंट समोरचा स्पष्टपणे वाचूदेखील शकतो. त्यामुळे स्कॅन केलेले डॉक्युमेंट व्यावसायिक (प्रोफेशनल) पद्धतीने सादर केले जाऊ शकतात, याची खात्री देण्यात आली आहे. त्यामुळे व्यवसायसंबंधित असो किंवा वैयक्तिक, दोन्ही गरजांसाठी हे फीचर बेस्ट ठरणार आहे. पावत्यांपासून ते नोट्सपर्यंत अनेक गोष्टी तुम्ही स्कॅन करून पाठवू शकणार आहात.

# समाजसेवी उद्योजक रतन टाटा



## निमित्त

'टाटा' हे फक्त नाव नाही. तर तो विश्वास, विश्वासार्हतेला असलेला समानार्थी शब्द आहे. टाटांच्या घराण्यातील प्रत्येकानं तो सार्थ करून दाखवला आहे. याच टाटा समूहातील आणखी एक चकाकता हिरा म्हणजे रतन टाटा. भारतीय उद्योगविश्वाचा मुकुटमणी असलेले रतन टाटा फक्त उद्योग विश्वासाठीच नव्हे तर सर्व भारतीय समाजासाठीच आदर्श होते. ज्यांच्यापुढे सर्वांनीच आदरानं नतमस्तक व्हावं अशा काही मोजक्या व्यक्तिमत्त्वांपैकी ते एक होत

रतन टाटा यांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ रोजी मुंबईत नवल टाटा आणि सुनी टाटा यांच्या पोटी झाला. आर्किटेक्चर आणि स्ट्रक्चरल अभियांत्रिकीचा अभ्यास करण्यासाठी ते १९५९ मध्ये कॉर्नेल विद्यापीठात गेले आणि १९६२ मध्ये भारतात परतण्यापूर्वी त्यांनी लॉस एंजेलिसमध्ये जोन्स आणि इमन्स यांच्यासोबत अल्प कालावधीसाठी काम केले.

करिअरची सुरुवात टाटा स्टीलमधून

रतन टाटा यांनी १९६२ मध्ये टाटा स्टीलच्या जमशेदपूर शाखेतून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली, त्यानंतर ते व्यवस्थापन शिकण्यासाठी १९७५ मध्ये हार्वर्ड बिझनेस स्कूलमध्ये गेले.

१९९१ हे टाटा समूहासाठी भारतासोबत महत्त्वाचे वर्ष होते. या काळात देशाचे खाजगीकरण आणि उदारीकरण यांसारख्या प्रमुख सुधारणा अंमलात आणल्या गेल्या. त्याच वर्षी त्यांनी टाटा समूहाचे अध्यक्षपद स्वीकारले. या काळात रतन टाटा यांच्या नेतृत्वाखाली टाटा भारताबाहेर पसरले आणि जगभर पसरले. आज टाटा समूह मीठ ते ट्रक बनवण्याच्या व्यवसायात आहे.

जगातील मोठ्या कंपन्या विकत घेतल्या

रतन टाटा यांच्या नेतृत्वाखाली २००० मध्ये टेटलीच्या अधिग्रहणापासून सुरुवात करून टाटाने अवघ्या नऊ वर्षांत ३६ कंपन्यांचे अधिग्रहण केले. या काळात त्यांच्या नेतृत्वाखाली टाटा स्टीलने कोरस स्टीलचे संपादन आणि टाटा मोटर्सने जॅग्वार आणि लँड रोव्हर या लक्झरी कार कंपन्यांचे संपादन हे सर्वात प्रमुख मानले जाते.

रतन टाटा यांच्या साधेपणाचे अनेक किस्से आहेत रतन टाटा ज्यावेळेस टाटा सन्सचे चेअरमन झाले तेव्हा ते जेआरडी टाटांच्या खोलीत बसले नाहीत. त्यांनी स्वत:साठी एक साधी आणि छोटीशी खोली तयार करून घेतली. तेच त्यांचं कार्यालय होतं.

रतन टाटा जेव्हा एखाद्या कनिष्ठ अधिकाऱ्याशी बोलत असायचे, त्याचवेळेस जर एखादा वरिष्ठ अधिकारी त्यांना भेटायला आला तर ते वरिष्ठ अधिकाऱ्याला वाट पाहायला सांगत असत. कनिष्ठ अधिकाऱ्याला जायला सांगून वरिष्ठाची भेट घेतली असे ते कधी करत नसत.

रतन टाटा यांना जवळून ओळखणाऱ्याचं म्हणणं आहे की जिद्द हे रतन टाटा यांच्या कुटुंबाचं स्वभाव वैशिष्ट्ये होते. जेआरडी टाटा आणि त्यांचे वडील नेवल टाटा यांच्याकडून रतन टाटांकडे हा गुण आला होता.सुहेल सेठ सांगतात, तुम्ही त्यांच्या डोक्याला बंदूक लावलीत तरी ते हेच म्हणतील की मला गोळी घाला, पण मी माझा मार्ग सोडणार नाही.

भारतात कोरोनाचं संकट आल्यानंतर आणि त्यानंतर लागू झालेल्या लॉकडाऊनमुळे निर्माण झालेल्या आर्थिक संकटाला तोंड देण्यासाठी म्हणून रतन टाटांनी तत्काळ टाटा ट्रस्टकडून ५०० कोटी रुपये आणि टाटा कंपन्यांकडून १००० कोटी रुपयांची मदत केली होती.

स्वत:ला मोठ्या धोक्यात टाकणाऱ्या डॉक्टर्स आणि आरोग्य सेवकांना राहण्यासाठी त्यांनी टाटांच्या लक्झरी हॉटेलचा वापर करण्याची ऑफर दिली होती, असे पाऊल उचलणारेदेखील रतन टाटाच पहिले होते.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!

(छाया : जितू शिगवण)



**अलिबाग : नाताळच्या सुट्ट्यांमध्ये समुद्र किनारी पर्यटकांची गर्दी झाल्याने खेळाच्या मैदानावर गाड्या पार्क केल्या जातात.**

## आरोग्य प्रहर

# रक्तशर्करा एक तासात कमी करता येऊ शकते?

रक्तातील साखरेची अचानक झालेली वाढ विविध कारणांमुळे संभवते. अति ताणतणाव, निर्जलीकरण, आहारातील निवडी, जास्त प्रमाणात साखर खाणे, कॅफिन पिणे, पुरेशी झोप न लागणे, शारीरिकदृष्ट्या निष्क्रिय असणे किंवा डॉक्टरांनी सांगितलेली औषधे न घेणे.रक्तातील साखरेची उच्च पातळी हायपरग्लायसेमिया ही चिंताजनक बाब असू शकते. रक्तातील साखरेची अचानक झालेली वाढ विविध कारणांमुळे संभवते. अति ताणतणाव, निर्जलीकरण, आहारातील निवडी, जास्त प्रमाणात साखर खाणे, कॅफिन पिणे, पुरेशी झोप न लागणे, शारीरिकदृष्ट्या निष्क्रिय असणे किंवा डॉक्टरांनी सांगितलेली औषधे न घेणे.एखादी व्यक्ती निम्न व्यायाम करून, एक तासाच्या आत रक्तातील साखरेचे प्रमाण कमी करू शकते. बिनसाखरेची ग्रीन टी प्या,२०–३० मिनिटे चाला,१५–२० मिनिटे पायऱ्या चढा,चार ग्लास पाणी प्या,आल्याचा चहा प्या.




डॉक्टर म्हणतात की, रक्तात साखरेची अत्यंत उच्च पातळी असणे जीवघेणी बाब ठरू शकते, संभाव्य गुंतागुंत टाळण्यासाठी ती तत्काळ कमी करण्याची गरज आहे. एखादी व्यक्ती त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यासाठी किंवा योग्य प्रमाणात ठेवण्यासाठी विविध हॅक किंवा तंत्रे वापरून पाहू शकते. आपण भरपूर द्रवपदार्थ प्यायल्याची खात्री करा, जसे की पाणी. हायड्रेटेड राहिल्याने तुमच्या मूत्रपिंडांना शरीरातील अतिरिक्त साखर बाहेर काढण्यास मदत मिळते. योगासने किंवा चालणे यांसारखे हलके व्यायाम तुमच्या रक्तातील साखरेची पातळी कमी करू शकतात. कारण– शारीरिकदृष्ट्या सक्रिय असण्याने स्नायूंद्वारे ग्लुकोजच्या शोषणास प्रोत्साहन देताना इन्सुलिनची संवेदनशीलता वाढण्यास मदत होते.रक्तातील साखर कमी करण्याच्या इतर प्रभावी पद्धतींमध्ये भरपूर पाणी, दालचिनीचे पाणी, ग्रीन टी किंवा थोड्या प्रमाणात (एक चमचा) ॲपल सायडर व्हिनेगर पिणे यांचा समावेश होतो. त्याशिवाय श्वासोच्छवासाचा व्यायाम नाकपुडी किंवा डायफ्रामॅटिक श्वासोच्छ्वास (१० ते १५ मिनिटे) रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यास मदत करू शकतो. नियंत्रित पातळी राखू पाहणाऱ्याला, विशेषत: प्री–डायबेटिक किंवा डायबेटिक असलेल्यांना फायदा होतो. टाईप–२ चा मधुमेह असलेल्या लोकांसाठी, जिथे इन्सुलिन प्रतिरोधकता ही एक समस्या आहे. इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता कमी करण्यात आणि रक्तातील साखरेचे प्रमाण स्थिर करण्यासाठी मदत करण्यात महत्त्वाची भूमिका निभावू शकतात.

# ट्रॅफिक जॅमने पर्यटकांचे बेहाल

## अलिबाग ते रेवदंडादरम्यान वाहतूक कोंडी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

नाताळ सुट्टी तसेच वर्षाअखेरची मौजमज्ञासाठी समुद्र किनाराचा मनमुराद आस्वाद घेण्यासाठी प्रचंड संख्येने पर्यटक अलिबाग ते मुरूड पट्टामध्ये हजेरी लावली असून पर्यटकांच्या वाढत्या वाहनांचा ताण अलिबाग ते रेवदंडा मुख्यः रस्तावर पडला आहे. या रस्तावर मिनिटागणीत वाहतुक कोंडीस सामोरे जावे लागत असून ट्रफिक जॅमने पर्यटकांचे बेहाल झाले.

अलिबाग ते रेवदंडा दुर्तफा बागायतीमधून निघणारा हा रस्ता अरूंद, चिचोंळा तसेच वळणाचा आहे. या रस्ताने रेवदंडा,चौल,नागाव व मुरूड तालुक्यातील पर्यटनाकडे जा-ये करणारी लहान मोठी



विविध वाहनांची ऐन सुट्टीने रेलचेल मोठया प्रमाणात वाढली आहे. वाढत्या वाहतुकीने या रस्त्याला वाहतुक कोंडीस सामोरे जावे लागत आहे. परिणामी पर्यटकांची वाहने रस्त्याच्या वाहतुक कोंडीच्या विळख्यात खुप वेळ अडकून पडल्याने पर्यटकांचे बेहाल झाले.

थेट अलिबागहून निघालेली पर्यटकांच्या वाहनांना कुरूळ येथेच ट्रॅफिक जॅम समस्येला सामोरे जावे लागले. यामध्येच सार्वजनिक बांधकाम खात्याने रस्ता दुरूस्तीची कामे या दिवशीच काढल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण झाला होता. कुरूळ येथे वाहनांची लांबचलांब लाईन लागलेली दिसत होती. त्यानंतर आक्षी स्तंभ येथे सुध्दा अरूंद रस्ताने वाहतुक कोंडी झाली होती. पुढे नागाव शिवाजी महाराज पुतळयासमोरील मुख्यः रस्ताला नागाव बीचकडून ये-जा करणाऱ्या वाहनांचा अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे तेथे सुध्दा मिनिटागणीत वाहतुक कोंडी दिसून येत होती. नागाव हटाळे बाजारपेठेतील अरूंद रस्ताने दोन मोठी वाहने जा-ये करताना समस्या निर्माण होवून तेथेसुध्दा वाहतुक कोंडी दिसत होती. त्यानंतर श्री शारदा पेट्राल पंप, वरंडे फाटा, चौल पिरांचे देउळ, चौल नाका ते थेट रेवदंडा बाजारपेठेतील रस्ताला मिनिटागणीत वाहतुक कोंडीस सामोरे जावे लागत होते. पर्यटकांच्या वाढत्या वाहनांचा भार अलिबाग-रेवदंडा मुख्य : रस्ताला पेलवत नसल्याचे स्पष्ट चित्र दिसून येत होते. सध्या नाताळ सुट्टी, शनिवार,रविवारची सुट्टी तसेच आगामी सरते वर्ष यामुळे पर्यटकांची संख्या मोठया प्रमाणात या ठिकाणी वाढली आहे. अलिबाग ते रेवदंडा पट्टातील सर्वच हॉटेल,रिसार्ट हाउसफुल्ल झाले असल्याचे चित्र दिसते. अलिबाग ते रेवदंडा या मुख्यः रस्ताला वारंवार होत असलेल्या वाहतुक कोंडीची समस्या लवकरात दुर करावी व पर्यटकांचे पर्यटन सुखदायक व्हावे यासाठी अलिबाग ते रेवदंडा हा मार्ग समुद्र किनारी बाजूने नव्याने अस्तित्वात असावा अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## अलिबागमधील प्रमुख मार्गांवर आज, उद्या अवजड वाहनांना बंदी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील धरमतर पुल ते अलिबाग, मांडवा ते अलिबाग, आणि अलिबाग रेवडांदमार्गे मुरुड या मार्गावर २८ व २९ डिसेंबर असे दोन दिवस अवजड वाहनांच्या वाहतुकीस बंदी घालण्यात आली आहे. पर्यटकांची वाढती संख्या लक्षात घेवून वाहतूक कोंडी टाळण्यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी याबाबतचे आदेश पारित केले आहेत.

रायगड हा पर्यटन जिल्हा असल्याकारणाने पर्यटक हे मांडवा, किहीम, अलिबाग, आक्षी, नागाव, रेवदंडा, काशिद, मुरूड अशा पर्यटन स्थळी मोठ्या प्रमाणात आपआपली वाहने घेवून येत असतात. सध्या नाताळ निमित्ताने विद्यार्थ्यांना सुट्टी असल्याकारणाने पर्यटक हे रायगड जिल्ह्यामध्ये फिरण्याकरीता वेगवेगळ्या समुद्र किनाऱ्यावरील बीचला भेटी देत असतात. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग तसेच शहरामध्ये पर्यटकांची मोठ्या प्रमाणात रेलचेल असून त्यातच महामार्गावरील जड-अवजड वाहनांमुळे वाहतूक कोंडी होत आहे. वडखळ-अलिबाग हा रस्ता एकेरी रस्ता आहे. तसेच अलिबाग-रेवस व अलिबाग-रेवदंडा-मुरूड हे रस्ते अरूंद आहेत. पर्यटकांची प्रचंड प्रमाणात येणारी व जाणारी वाहने व त्याच वेळी रोडवरून होणारी डंपर, ट्रक व इतर जड-अवजड वाहनांची वाहतूक कोंडी होण्याची तसेच अपघात होण्याची दाट शक्यता आहे. २८ व २९ डिसेंबर रोजी शनिवार व रविवार सार्वजनिक सुट्टी असल्याने पर्यटक हे मोठ्या प्रमाणात येणे अपेक्षित आहे. वाहतूक कोंडीमुळे पर्यटक व नागरीकांना मानसिक त्रास सहन करावा लागू नये व सध्या घडत असलेले अपघात पाहता, अपघाताचे प्रमाण कमी होण्याच्या दुष्टीकोनातून उपाययोजना म्हणून तसेच पर्यटक व नागरीकांचा प्रवास सुखरूप व्हावा याकरीता २८ डिसेंबर रोजी सकाळी ६ ते दि. २९ डिसेंबर रोजी रात्री १२ वाजेपर्यंत धरमतर पुल ते अलिबाग तसेच अलिबाग ते मांडवा जेट्टी व अलिबाग-रेवदंडा-मुरूड या राज्यमार्गावरील जड-अवजड वाहनांकरिता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वाहतूक बंदी अधिसूचना जारी केली आहे. हा निर्णय अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू नसेल , असेही जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले आहे.

## खासदार तटकरेंकडून रोह्यात नाट्यगृहाची पाहणी

### काम योग्यरित्या पूर्ण करण्याच्या सूचना

**रोहे : प्रतिनिधी**

शहरात रोहा अष्टमी नगर परिषदेचे अत्याधुनिक पद्धतीचे नाट्यगृह बांधण्यात येत आहे. या नाट्यगृहाच्या कामाची पाहणी खा. सुनील तटकरे यांनी शुक्रवारी सकाळी केली.

यावेळी त्यांच्या समवेत मुख्याधिकारी अजय एडके, पोलीस निरीक्षक देविदास मुपडे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, महेश कोल्हटकर, राजेंद्र जैन, अहमद दर्जी, मयूर दिवेकर, नितीन पिंपळे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, मयूर पायगुडे, निलेश शिर्के, अजित मोरे, ठेकेदार रुपेश पाटील, अजित मोरे, विनीत वाकडे, अशोक धोत्रे, रोहा नगरपरिषदेचे ओंकार भुरण, रवी चाळके, नितीन कोलटकर आदी उपस्थित होते.

नाट्य रसिकांना पर्वणी ठरावे अशा पद्धतीचे रोहा शहरात खा. सुनील तटकरे, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व माजी आ. अनिकेत तटकरे यांच्या संकल्पनेतून अत्याधुनिक पद्धतीचे नाट्यगृह होत आहे. या नाट्यगृह अंतर्गत उत्कृष्ट दर्जेदार आसन



व्यवस्था, अत्याधुनिक प्रकाश योजना, साऊंड सिस्टिम, उपहारगृह, मेकअप रूम होत आहे. हे नाट्यगृह जिल्ह्यातील एक सुसज्ज असे नाट्यगृह म्हणून नावारूपाला येणार आहे.

खा. सुनील तटकरे यांनी शुक्रवारी दुपारी बांधण्यात येत असलेल्या नाट्यगृहाची पाहणी केली. यावेळी त्यांनी नाट्यगृहातील आसन व्यवस्था,स्टेज,पार्किंग यास नाट्यगृहातील विविध विभागाची पाहणी केली. नाट्यगृहातील अंतर्गत बाबी या संबंधित माहिती घेत त्यांनी संबंधित ठेकेदार व नगरपरिषदेचे अभियंता यांना विविध सूचना दिल्या. यावेळी त्यांनी नाट्यगृहाचे काम योग्यरित्या होणे आवश्यक आहे यामध्ये कोणतेही हाय गय खपवून घेतली जाणार नाही असे सांगितले. रोहा खा. सुनिल तटकरे यांच्या संकल्पनेतून सुंदर व सुख सुविधायुक्त शहर बनवण्यात येत आहे. याच अनुषंगाने रोहा शहरात होत असलेले अत्याधुनिक नाट्यगृह रोहे शहराच्या वैभवात भर पडणारी ठरणार आहे.

## दुचाकी अपघातात तीन जण जखमी

**खालापूर :** मुंबई पुणे जुन्या महामार्गावरील बोर घाटातून उतरुन खालापुरातील हाळ येथे जात असताना मोटारसायकलचा अपघात झाला. या अपघातात तीन जण जखमी झाल आहेत. केएमसी कॉलेज खोपोली येथे पाणी पुरवठा साठवण टाकीतून पाणी गळती होऊन पाणी मार्गावर येत खड्डा निर्माण झाला आहे. या खड्ड्यात मोटारसायकल घसरून अपघात झाला. मोटारसायकल अपघातात सतीश कातकरी, प्रदीप कातकरी, सनी वाघमारे. हे तिघे जखमी झाल्याने खोपोलीतील डॉ बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले एकाच मोटारसायकल वरून हे तिघे खालापुरातील तिसरा हाळ येथे जात होते.त्यांच्यावर उपचार सुरू असून मोटारसायकल स्वाराने मद्य प्राशन केले असल्याचे सांगण्यात येत आहे ही घटना गुरुवारी सायंकाळी सहा वाजता घडली.

## पेण-खोपोली बायपास रस्त्यावर दोन अपघात; एक ठार, दोन जण जखमी

**पेण : प्रतिनिधी**

खोपोली बायपास रस्त्यावर पेण तालुक्यातील धावटे व गणपतीवाडी दरम्यान लागोपाठ दोन विचित्र अपघात झाले. पहिल्या अपघातात बाईकस्वार जागीच ठार झाला. काही वेळात पुन्हा एक अपघात त्याच रोडवर झाला. यामध्ये दोन बाईकस्वार गंभीर जखमी झाले.

पेण - खोपोली बायपासवरील धावटे गावाजवळ बाईकस्वार धर्मेश छोटेलाल शहा (२३) हा आपल्या ताब्यातील केटीएम कंपनीची ड्युक मोटारसायकल घेऊन तरणखोप बाजूकडून येत असताना धावटेजवळ अशोक लेलँड चार चाकी टेम्पोला धडकला. यामध्ये बाईकस्वाराच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. या घटनेची माहिती मिळताच कल्पेश ठाकूर यांनी आपल्या रुग्णवाहिकेतून त्याला उपजिल्हा रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्यानंतर त्याच रोडवर गणपतीवाडीच्या हद्दीत ए. जी. फार्मजवळ प्रसाद विनायक कोळी आणि ओमकार दत्तात्रय कोळी हे दोन युवक वावोशी दिशेकडून येत असताना त्यांच्या ताब्यातील व्ही. एस. एनटॉक स्कूटर घेऊन येत असताना तरणखोप बाजूकडून खोपोलीकडे जाणारा सिमेंट बल्कर ट्रक व दुचाकीमध्ये समोरासमोर जोरदार धडक झाली. यामध्ये विनायक कोळी व ओमकार कोळी यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली.

या वेळी ही कल्पेश ठाकूर यांनी अपघातग्रस्तांना उपचाराकरिता पेण उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. या दोन्ही घटनेची नोंद पेण पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## खोपोलीत बलिदान सप्ताहानिमित्त कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

शिखांचे दहावे गुरू गोविंद सिंह यांचे चार चिरंजीव साहेब जादे अजित सिंह, जुझार सिंह, जोरावर सिंह आणि फतेह सिंह हे २१ ते २७ डिसेंबर १७०४ या कालावधीमध्ये शहीद झाले. देश आणि धर्मासाठी स्वतः चं बलिदान करणाऱ्या या चार चिरंजीवांचे स्मरण म्हणून खोपोलीतील स्वामी प्रेरणा सामाजिक सेवा संस्थेतर्फे ब्राह्मणसभा सभागृहात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी खोपोली गुरुद्वारा कमिटीचे सेक्रेटरी चरणजीत सिंग सैनी, वीरेंद्र सिंग, इंद्रपालसिंग कोहली, अश्विनी कुमार चंदेल, अविनाश मोरे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी प्रेरणा सेवा संस्थेचे अध्यक्ष राकेश पाठक होते. प्रास्ताविक प्रशांत शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन कृष्णा जंगले यांनी केले तर आभार उपेंद्र करमरकर यांनी मानले.

## नेरळमध्ये भल्या पहाटे साजरा झाला हुतात्मा स्मृतीदिन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांचा तिथीप्रमाणे स्मृतिदिन नेरळ येथील कोतवाल वाडी मध्ये साजरा करण्यात आला. भल्या पहाटे नेरळकरांनी हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

मुरबाड तालुक्यातील सिद्धगड येथे क्रांतिकारक भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांना ब्रिटिशांच्या गोळ्यांपुढे आपले प्राण गमवावे लागले. त्यादिवशी २ जानेवारी १९४३ रोजी मार्गशिष एकादशी होती आणि त्यामुळे नेरळ कोतवाल वाडी ट्रस्ट मध्ये या दोन्ही हुतात्म्यांना तिथीप्रमाणे आदरांजली वाहिली जाते.

हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील या दोन्ही हुतात्म्यांवर पहाटे सहा वाजून दहा मिनिटांनी ब्रिटिशांनी गोळीबार केला होता म्हणुन त्या वेळी क्रांतिज्योत पेटवून अभिवादन करण्याची प्रथा स्वातंत्र्य सैनिक हरिभाऊ भडसावळे यांनी १९४८ मध्ये सुरू केली आहे. कोतवालवाडी मध्ये हुतात्मा



भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचा स्मृतिदिन येथील संशोधक शेखर भडसावळे हस्ते क्रांति ज्योत प्रज्वलित करण्यात आली. पहाटे असंख्य नेरळकर आणि देशप्रेमी नागरिक त्या ठिकाणी उपस्थित होते.

कोतवालवाडी ट्रस्ट मध्ये कृषीरत्न शेतकरी शेखर भडसावळे यांच्या हस्ते क्रांति ज्योत प्रज्वलित करण्यात आली. कोतवाल वाडी ट्रस्टच्या अध्यक्षा संध्या देवस्थळे, माजी अध्यक्ष अनसूया पादिर व विश्वस्त यावेळी उपस्थित होते. कोतवाल वाडी ट्रस्टचे विश्वस्त बाळकृष्ण पादीर यांनी कृषी भूषण कृषीरत्न शेतकरी शेखर भडसावळे यांच्या कार्याची माहिती दिली. त्यानंतर कोतवालवाडी वस्तीगृहाचे व नर्सिंग विद्यार्थी, नेरळ विद्या मंदिर, नेरळ विद्या विकास मंदिर या शाळांच्या विद्यार्थ्यांनी समूहगीत सादर केली.तर कोतवाल वाडी मध्ये एन एस एस कॅम्प साठी आलेल्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

यावेळी अमेरिकन युनिव्हर्सिटी कडून पर्यावरणपूरक कार्याबद्दल सन्मानित करण्यात आलेले आणि डॉ नॉर्मन पुरस्काराचे सन्मानित शेखर भडसावळे यांनी आपल्या भाषणात तरुणांनी शेतीकडे वळले पाहिजे. शेतकरी जगला तरच देश जगणार आहे आणि त्यामुळे शेती करण्यासाठी तरुण वर्गाने पुढाकार घेतला पाहिजे. शेती शिवाय तरणोपाय नाही. याबाबत अनेक उदाहरणे देवून भडसावळे यांनी देशाचे अर्थ व्यवस्थेत कृषी विभाग किती महत्वाचा आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न केला.

## घोड्यांमुळे माथेरानच्या पर्यावरणाचा ऱ्हास

◆ डॉ. बाबासाहेब आंबेडकर पर्यावरण संस्था करणार अभ्यास

**माथेरान : प्रतिनिधी**

घोड्यांमुळे माथेरानच्या पर्यावरणाचा होणार ऱ्हास थांबवण्यासाठी विविध उपाययोजना सुचविण्यासाठी दि.२५ ऑक्टोबर रोजी हरित लवादाने तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे . या समितीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर या विद्यापीठाकडे जबाबदरी देण्याचा निर्णय घेतला आहे.

सामाजिक कार्यकर्ते सुनिल शिंदे व ई रिक्षा चालक केतन रामाणे यांनी हरित लवाद पुणे बेंच येथे दाखल केलेल्या याचिकेमुळे पर्यावरणाचा घोड्यांमुळेहोणार ऱ्हास थांबवण्यासाठी विविध उपाययोजना सुचविण्यासाठी हरित लवादाने तीन सदस्यीय समिती स्थापन केली होती. या संयुक्त कामिटीमध्ये



पर्यावरण खात्याचे शास्त्रज्ञ श्रेणी -ई ,राहुल इंगळे मुख्याधिकारी माथेरान नगरपालिका व ऋतुजा भालेराव विभागीय अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड यांनी नोव्हेंबर महिन्यात माथेरानच्या विविध भागाची पाहणी केल्यानंतर घोड्यांच्या परिणामांचे गांभिर्य पाहता पर्यावरणातील तज्ञ संस्थेची नेमणूक करण्याचा निर्णय घेतला.

संयुक्त समितीने पाच संस्था सोबत चर्चा केली.डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाकडे जबाबदरी देण्याचा निर्णय घेतला. न्यायालयाने दि.२३ डिसेंबर रोजी या अभ्यासासाठी तीन महिन्यांची मुदत दिल्याने पुढील सुनावणी दि १५ एप्रिल रोजी ठेवली आहे. तत्पूर्वी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने माथेरानचे पर्यावरण अबाधित रहावे यासाठी फेब्रुवारी २००३ मध्ये माथेरानला पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित केले आहे

माथेरानचा एकूण परिसर ७.२ स्क्वेअर किमी इतका आहे ७० टक्के परिसर वनराईने व्यापला आहे. घोडा झाडाच्या संपर्कात आल्याने अनेक झाडे मृत पावली आहेत त्यामुळे पर्यावरणाची विपरीत हानी होत आहे.


### सावधान नोटीस

तमाम जनतेस या सावधान नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकती हया सदर मिळकतीचे मुळ मालक **कै. राजेंद्र विठ्ठल अहिरे यांचे वारस श्रीमती दिपाली राजेंद्र अहिरे यांनी श्री. रविंद्र जोमा भगत, वगैरे** यांच्या संमतीने आमच्या अशिलांना विक्री करण्याचे मान्य करुन त्याबाबत नोटराईज्ड करारनामा लिहून दिलेला असून त्यापोटी आमच्या अशिलांकडून मोठी रक्कम स्विकारलेली आहे. परंतु, सदर मिळकतींचे जमीन मालक हे सदर व्यवहार पूर्ण करण्यास टाळाटाळ करीत असून अनाधिकाराने सदर मिळकतींमध्ये त्रयस्थांचे हक्क, हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमच्या अशिलांना समजले आहे. सबब, प्रस्तुतची सावधान नोटीस आमचे अशिल प्रसिध्द करीत आहेत.

तमाम जनतेस या नोटीसीने सावधान करण्यात येत आहे की, खाली परिशिष्टात नमूद जमीन मिळकतीबाबत व त्या मिळकतींच्या जमीन मालकांसोबत अथवा इतर कोणत्याही इसमाबरोबर कोणत्याही स्वरुपाचा करार/मदार / व्यवहार करु नये आणि केल्यास असा व्यवहार बेकायदेशिर ठरेल व तो आमच्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे-शिवकर, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट नं.. /हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| २१०/२ | ०-६६-०० पो.ख. ०-०२-०० | ६.६२ | **कै. राजेंद्र विठ्ठल अहिरे यांचे वारस श्रीमती दिपाली राजेंद्र अहिरे** |
| २१०/५ अ | ०-२५-८० पो.ख. ०-०४-८० | २.६९ | |

**पनवेल.**
**दि. २७/१२/२०२४**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१



### दि पनवेल को अर्बन बँक लि.

**४७१, टिळक रोड, कापड बाजार, पनवेल-रायगड**
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९८, १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ नुसार

**जाहीर लिलाव नोटीस**

श्री. देवचंद जनार्दन कोळी रा. जेसल मेलोडी, ६०४, प्लॉट नं. ३०३/२, तक्का इंडिअन ऑईल पेट्रोल पंपाच्या मागे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि यांच्याकडून घेतलेल्या कर्जाचा भरणा न केल्यामुळे सहकारी न्यायालय अलिबाग, रायगड यांच्या कडे दावा क्र. सीसी/आरजीडी/९०/२०२१ निशाणी क्र. ३८ दाखल करून बँकेने हुकुमनामा मिळविला आहे. सहकारी न्यायाल्याने सदरील व्यक्तीच्या मिळकती जप्त करून कर्ज रकमा, त्यावरील व्याज व त्यावरील अनुषंगिक खर्च वसूल करण्याचा हुकुम केला आहे. तसेच खाली सही करणाऱ्यानेसुद्धा वेळोवेळी आदेश काढून गहाण ठेवलेली मिळकत दिनांक. १३.०६.२०२३ रोजी जप्त केली आहे.

तरी सर्व लोकांस कळविण्यात येते की, श्री. देवचंद जनार्दन कोळी यांनी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि यांच्याकडून घेतलेल्या कर्जासाठी खालील नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मिळकतीचा लिलाव जसे आहे आणि जेथे आहे त्या परस्थितीत शुक्रवार दि. ०३/०१/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता बँकेच्या ४७१, टिळक रोड, कापड बाजार, पनवेल येथील बँकेच्या मुख्य कार्यालयात करण्यात येणार आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव आणि पत्ता | मिळकतीचे वर्णन | एरिया |
|---|---|---|---|
| १. | श्री. देवचंद जनार्दन कोळी रा. जेसल मेलोडी, ६०४, प्लॉट नं. ३०३/२, तक्का इंडिअन ऑईल पेट्रोल पंपाच्या मागे, ता. पनवेल, जि. रायगड | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील तक्का येथील शॉप नं. ११, तळमजला, श्री सिद्धीविनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नं. ४२२, तक्का गाव, ता. पनवेल जि. रायगड | ११.१५ स्क्वेअर मीटर (कारपेट एरिया) आणि ३.७२ स्क्वेअर मीटर (लॉप्ट एरिया) |

सदरील कर्जाची दि. ३१.०५.२०२४ पर्यंत थकबाकी रु.२१,३०,७०३/- (अक्षरी एकवीस लाख तीस हजार सातशे तीन रुपये मात्र) अधिक ०१.०६.२०२४ पासून पुढील होणारे व्याज अधिक होणारा खर्च. माननीय जिल्हा उपनिबंधक साहेब अलिबाग यांनी जरी त्यांच्या आदेशाने सदरील मिळकतीची अपसेट किंमत रु. २१,६०,०००/- एवढी मान्य केली आहे. परंतु सदर मिळकतीचा तीन वेळा लिलाव लावण्यात आला असून सदर लिलावास कोणीही भाम न घेतल्याने सदर लिलाव हे स्थगित करण्यात आले होते. मा जिल्हा उपनिबंधक अलिबाग यांच्या दि. ३०.०५.२०२४ अनुसार मान्यताप्राप्त मुल्यांकनकर्ता यांचेकडील डिस्ट्रेस व्हॅल्यु रु.१६,२०,०००/- एवढे मुल्यांकन करून दिले आहे त्यामुळे त्यापेक्षा कमी रकमेची बोली रक्कम स्वीकारली जाणार नाही. लिलावातपरंतु भाग घेणाऱ्यांनी इसारा रक्कम बँकेच्या नावाने बँकेत अनामत रक्कम म्हणून पनवेल अर्बन बँकेच्या खात्यामध्ये रु.८१,०००/- वरील लिलावाच्या तारखेच्या किमान ५ दिवसापूर्वी (कामकाजाच्या दिवशी) भरणा करावा लागेल जास्तीत जास्त बोली लिलावामध्ये मंजूर केली जाईल. बँकेने दैनिक रामप्रहार मध्ये दि. ३०.११.२०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार श्री. गजानन शिवसिंग पाटील, अमेय श्रीकांत ठगे, मोहनसिंग शिवसिंग पाटील यांनी सदर इसारा रक्कम भरून लिलावामध्ये सहभाग घेऊन ऑफर प्राईज वे सीलबंद लिफाफे बँकमध्ये दाखल केले होते. परंतु मागील लिलावास स्वतः कर्जदार श्री. देवचंद जनार्दन कोळी हे हजर राहून त्यांनी त्यांच्या कर्जाची रक्कम पूर्ण भरण्याची हमी घेतली होती. हमी घेते वेळी त्यांनी बँकेत सदर इसारा रक्कम रु.८१०००/- भरून आठ दिवसात कर्ज रकमेच्या २५% रक्कम भरण्याचे कबुल केले होते, पैसे न भरल्यास प्रथम लिलावाचे प्राधान्य दि.१६.१२,२०२४ रोजी सहभाग घेतलेल्या व्यक्तीना देण्यात यावा असे लेखी लिहून बँकेस दिले होते. तथापी त्यांनी कर्जदार श्री. देवचंद कोळी यांनी त्यांच्या कर्जाची २५% रक्कम विहित मुदतीमध्ये भरणा केलेली नाही. त्यामुळे शुक्रवार दि. ०३.०१.२०२५ रोजी सदर मिळकतीचा लिलाव करण्याचे ठरले आहे. सदर लिलावास श्री. गजानन शिवसिंग पाटील, अमेय श्रीकांत ढगे, मोहनसिंग शिवसिंग पाटील यांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

कोणतेही कारण न देता लिलाव मंजूर करणे अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार वसुली व विक्री अधिकारी यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे. लिलावाच्या बाकीच्या सर्व अटी व नियम शाखाधिकाऱ्यांकडे व खालील सही करणाऱ्यांकडे उपलब्ध आहेत व त्या बँकेच्या कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आणि त्या लिलावामध्ये भाग घेणाऱ्यांस बंधनकारक आहेत याची नोंद घ्यावी.

**स्थळ : पनवेल**
**दिनांक : २६.१२.२०२४.**

**सही/-**
**वसुली व विक्री अधिकारी**
दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल

## निवडक

### कोळशाने भरलेल्या वाहनाला आग

**पनवेल :** जेएनपीटी ते पळस्पेकडे जाणाऱ्या रोडवर निसर्ग ढाब्याजवळ गुरुवारी (दि.२६) कोळसा भरलेल्या



वाहन (एमएच ४२ बीएफ ३१३१) याला आग लागली होती. वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेमुळे फायर ब्रिगेडच्या मदतीने ही आग विझवण्यात आली. रात्रगस्ती दरम्यान उरण वरून पनवेलकडे येत असताना वाहतूक शाखेचे पीएसआय मनोज महाडिक व चालक निकम, पोलीस शिपाई चव्हाण यांनी एका कोळसा घेऊन जाणाऱ्या ट्रकला आग लागली असल्याचे पाहिले. ही गोष्ट लक्षात येताच त्यांनी वाहनचालकाला वाहन बाजूला घेऊन उभे करण्यास सांगितले व गाडीला आग लागल्याचे त्याच्या निर्दशनास आणून दिले. त्यानंतर वाहतूक पोलिसांनी पनवेल महानगरपालिका फायर ब्रिगेडला बोलावले. फायर ब्रिगेडची गाडी येऊन त्यांनी ही आग वेळीच आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे.

### वीर बाल दिवसनिमित्त अभिवादन

**नवी मुंबई :** शीखांचे गुरू गोविंदसिंगजी यांचे सुपूत्र जोरावरसिंग आणि फतेहसिंग यांच्या लहान वयातील



शहादतीचे स्मरण करीत २६ डिसेंबर या दिवशी संपूर्ण देशभरात वीर बाल दिवस म्हणून विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. शासन निर्णयानुसार नवी मुंबई महापालिकेच्या वतीने मुख्यालयातील ॲम्फिथिएटरमध्ये या दोन्ही वीर बालकांचे प्रतिमापूजन करून स्मरण करण्यात आले. या वेळी प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार, समाजविकास विभागाचे उपायुक्त किसनराव पलांडे, क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव, प्रशासकिय अधिकारी विलास मलुष्टे व रवी जाधव आणि इतर नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

### वेताळ देवाची पूजा-अर्चा

**उरण :** सालाबादाप्रमाणे यावर्षीही न चुकता गव्हाण येथील



आगरी कोळी बांधवांनी धार्मिक रीती रिवाज व परंपरेनुसार वेताळ देवाची पूजा-अर्चा, प्रार्थना केली. बुधवारी (दि.२५) मोठ्या भक्तीभावाने उरण मोरा येथून समुद्रमार्गे बोटीने प्रवास करत खंदेरी या किल्ल्यावर गेले. या वेळी कामगार नेते महेंद्र घरत, मनोज फडकर, एमजी ग्रुपचे किरीट पाटील, वैभव पाटील, प्रशांत पाटील, मुरलीधर ठाकूर, लक्ष्मण ठाकूर, योगेश रसाळ, अजित ठाकूर, राजेंद्र भगत, प्रित म्हात्रे, निखिल गावंड, मेहबूब लदाफ आदी उपस्थित होते.

### हायमास्ट बसविण्याची मागणी

**नवी मुंबई :** सीवूड्स सेक्टर ५० जुने साईबाबा मंदिराजवळ



असणाऱ्या मुख्य चौकात हायमास्ट दिवे बसवण्याची मागणी करण्यात आली आहे. सीवूड्स येथील जुने साईबाबा मंदिराजवळील मुख्य चौकात नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. या ठिकाणी तिन्ही रोड एकत्र येत असून शालेय विद्यार्थी, बाजारासाठी येणाऱ्यांची इथं नेहमी गर्दी असते, मात्र हा चौक अपुऱ्या लाईटमुळे अंधारमय असतो. सिवूड्स मनसे विभाग अध्यक्ष अमोल आयवळे यांनी राजू खाडे, प्रद्युमन हेगडे यासह मनपा अधिकारी यांची भेट घेऊन सदर ठिकाणी हायमास्ट बसवण्यात यावा, अशी मागणी केली आहे. याबाबतचे निवेदन मनपा कार्यकारी अभियंता संजीव पाटील यांना दिले आहे. याबाबत त्वरित निर्णय घेत अंमलबजावणी करण्यात येईल, असे संजीव पाटील यांनी मनसे पदाधिकारी यांना आश्वासीत केले.

### आनंद विवाह नोंदणीस सुरुवात

**नवी मुंबई :** महाराष्ट्र राज्य शासनाच्या २३ एप्रिल २०२० रोजीच्या अधिसूचनेनुसार महाराष्ट्र आनंद विवाह नोंदणी नियम २०२० अन्वये शीख आनंद धार्मिक विवाह रितीरिवाजानुसार झझाल्यास त्याची नोंदणी 'आनंद विवाह नोंदणी अधिनियम १९०९' नुसार करण्याची अंमलबजावणी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मान्यतेने सर्व आठही विभाग कार्यालय स्तरावर सुरु करण्यात आलेली आहे. याकरिता आवश्यक माहिती व आवश्यक कागदपत्रांचा तपशील सर्व विभाग कार्यालयांच्या स्तरावर उपलब्ध करण्यात आलेला आहे. नमुंमपा महापालिका कार्यक्षेत्रातील सर्व शीख समाज बांधवांनी, या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

### डायलेसिस रुग्णांना आर्थिक मदत

**पनवेल :** तळोजा येथील व्हिस्टा प्रोसेस प्रा.लि.कंपनीकडून पनवेल शहरातील न रा. स्व. संघ जनकल्याण समिती डॉ.



प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयास डायलेसिस रुग्णांना मदत म्हणून पाच लाखांचा धनादेश कंपनीचे एम.डी. भुपेंदर सिंग यांनी सुपूर्द केला. या वेळी रुग्णालयाच्या अध्यक्षा डॉ.किर्ती समुद्रे, मुख्य संचालक व्यवस्थापक सुनील लघाटे व रुग्णालय जनसंपर्क अधिकारी प्रसन्न खेडकर यांना सुपूर्त केला. अशा दानशूर व्यक्तिंच्या आर्थिक सहकार्याने रुग्णालय रुग्णांना केवळ ५०० रुपये व ज्यांना हे पण जास्त आहेत त्यांना ३०० रुपयांमध्ये डायलेसिस करते. रुग्णालय व कंपनीमधील दुवा म्हणून कंपनीचे सल्लागार चंद्रशेखर सोमण यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# फर्निचर दुकानात बेकायदा धार्मिक स्थळ

## भाजपचे राहुल शिंदे यांची तक्रार

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली सेक्टर २० स्मशानभूमी लगत भूखंडावर अनधिकृत फर्निचर दुकान स्थापन करण्यात आलेले आहे. या अनधिकृत दुकानात अनधिकृतपणे धार्मिक स्थळ उभारण्यात आले आहे. या परिसरात अनधिकृतपणे नागरीक राहत असून, त्याच्याकडून उघड्यावर प्रातःविधी उरकण्यात येत आहेत. त्यामुळे दुर्गंधी पसरलेली आहे. याबाबात ऐरोलीचे भाजप पदाधिकारी राहुल शिंदे यांनी ऐरोली विभाग कार्यालयात तक्रार दिली असून देखील त्यावर कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

राहुल शिंदे याबाबत सातत्याने पालिका प्रशासनाला या अनधिकृत धार्मिक स्थळ तसेच दुकानाबाबत अवगत करत आहेत. मात्र त्यांच्या तक्रारींकडे पालिका प्रशासन सातत्याने दुर्लक्ष करत आहे.या अनधिकृत दुकानात अनधिकृतपणे परप्रांतीय रहिवास करत आहेत. त्यांची संख्या २० ते ३० इतकी असल्याचे दिसून येते. हे नागरीक कोण आहेत ? कुठून आलेत? याबाबत पालिका अथवा पोलीस प्रशासनाकडून कोणतीही खातरजमा केली गेलेली नाही. त्याचबरोबर या परप्रांतीय नागरिकांनी आता अनधिकृत दुकानात अनधिकृतपणे मस्जिदसुद्धा स्थापन केली आहे. हे परप्रांतीय बांगलांदेशी रोहांगिया मुस्लिमसुद्धा असू शकतात अशी शंका राहुल शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

याआधी ऐरोली से. ३ दत्ता मेघे समोरील अनधिकृत मस्जिद काढताना नागरिकांना काय संघर्ष करावा लागला हे प्रशासनाला ठाऊक असून देखील अशा अनधिकृत बांधकामांबाबत डोईजड होईपर्यंत प्रशासन दुर्लक्ष का करते? असा प्रश्न यानिमित्ताने विचारला जात आहे. त्यामुळे या अनधिकृत धार्मिक स्थळांवर तातडीने कारवाई करावी अन्यथा पालिका कार्यालयावर मोर्चा काढू, असा इशारा शिंदे यांनी दिला आहे.

नवी मुंबईत उभारल्या जात असलेल्या मस्जिद अधिकृत आहेत की अनधिकृत याची पाहणी पालिकेने व सिडकोने करणे करावी, अशीही मागणी राहुल शिंदे यांनी केली आहे.

## वाशीत बारवर छापा; आठ जणांवर गुन्हा

**नवी मुंबई : बातमीदार**

जुहूगाव सेक्टर ११ मधील मॅग्नेट बारवर पोलिसांनी बुधवारी रात्री पावणेबारा वाजता कारवाई केली. या ठिकाणी महिला वेटर ग्राहकांशी अंगविक्षेप करीत असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी पाच महिला वेटर, व्यवस्थापक व इतर कर्मचारी अशा आठ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.



गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये व्यवस्थापक नारायण गिरी, वेटर बालेंद्र द्विवेदी, हरीओमकुमार चोपाल व पाच महिलांचा समावेश आहे. बारमध्ये रात्री उशिरापर्यंत महिला वेटर अंगविक्षेप करीत होत्या. या विषयी पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर या ठिकाणी धाड टाकण्यात आली. महिला वेटरनी अंगविक्षेप केल्याप्रकरणी व व्यवस्थापक व वेटरनी त्यांच्या आर्थिक फायद्यासाठी तसे करून दिल्याप्रकरणी संबंधितांवर भारतीय न्याय संहिता कलम २९६ ३ (५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

शहरातील इतरही बारमध्ये अशा प्रकारे नियमांचे उल्लंघन होत असल्यास व त्याविषयी तक्रारी आल्यास कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. यापुढेही अशाच प्रकारे कारवाया सुरू राहणार असून, पोलीस इतर गैरधंद्यांवरही लक्ष ठेवत आहेत.

## कोपरखैरणेत दोन दिवसीय ग्रंथोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे ग्रंथोत्सव २०२४चे आयोजन करण्यात आले आहे. हा भव्य ग्रंथोत्सव ३० व ३१ डिसेंबर २०२४ रोजी ज्ञान विकास संस्था, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे पार पडणार आहे.

या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून वनमंत्री गणेश नाईक, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व लोकसभा खासदार डॉ.श्रीकांत शिंदे हे असतील.

ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्रंथप्रेमींनी या ग्रंथोत्सवास भेट द्यावी, असे आवाहन ठाणे ग्रंथोत्सव २०२४ जिल्हा ग्रंथालय अधिकारी तथा समन्वय समितीचे अध्यक्ष सहाय्यक ग्रंथालय संचालक, मुंबई विभाग श्री.प्रशांत पाटील तसेच सर्व सदस्य, सदस्य सचिव यांनी केले आहे.

## दीक्षा वर्तकची गव्हाण विद्यालयास ग्रंथ भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजची आदर्श आणि प्रज्ञावंत विद्यार्थिनी दीक्षा



द्रौपदी रमेश वर्तक हिने वाढदिवसाच्या औचित्त्याने विद्यालयाच्या ग्रंथालयास ग्रंथ संच भेट दिला.

दीक्षा वर्तक हिच्या वाढदिवसादिनी विद्यालयालास सुट्टी असल्यामुळे तिने गुरुवारी (दि.२६) विद्यालयाच्या ग्रंथालयास पंधरा ग्रंथांचा संच भेट देऊन विद्यालयाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त करून वाचन संस्कृती व संस्काराचे महत्त्व देखील अधोरेखित केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांनी हे ग्रंथ संच स्वीकारला आणि विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे यांच्याकडे सुपूर्द केला.

या वेळी मुख्याध्यापक गोवर्धन गोडगे यांचेसह विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक व संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, देवेंद्र म्हात्रे व सागर रंधवे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे तसेच प्रशांत परदेशी, प्रमोद करावकर, विशांत ठाकूर, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, दीक्षाच्या मातोश्री द्रौपदी वर्तक, योगिता पाटील, चारुशीला ठाकूर, सुजाता शेलार आणि इतर मान्यवर व विद्यार्थी उपस्थित होते.

## आदिवासी बंधू-भगिनींना ब्लँकेटचे वाटप



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट रसायनी पाताळगंगा, पिल्लई एचओसी कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालय मोहोपाडा रसायनी यांच्यातर्फे इसांबे आदिवासीवाडी व तळवली दांडवाडी आदिवासी येथे गुरुवारी (दि.२६) उबदार ब्लँकेट वाटप करण्यात आले.

डोंगरावर राहणाऱ्या आदिवासी बंधू-भगिनींना गारव्याची झळ लागत असताना थंडीचा त्रास जाणवतो. थंडीपासून त्यांचे संरक्षण व्हावे, म्हणून ब्लँकेटचे वाटप करण्यात आल्याचे अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट यांनी सांगितले.

या वेळी विद्यार्थी ओमप्रकाश पासवान, शार्दुल शिंदे, तन्वी जाधव, प्रसाद कथारे, धर्मिष्टा नवले, चिन्मय परदेशी, साहील चौकर, भुमिक घोलप, समीक्षा चव्हाण, नेहा डांगे, रिया तांबोळी, सौरभ पारसी, श्रावणी कांबळे आदी विद्यार्थी उपस्थित होते.

## दिव्यांगांसाठी महिनाभर जनजागृतीपर कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका इटीसी अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राद्वारे दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विविध उपक्रम राबविले जात असतात. याचाच एक भाग म्हणून ३ डिसेंबर रोजीच्या जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून संपूर्ण डिसेंबर महिन्यामध्ये समाजामध्ये दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करणे तसेच दिव्यांग मुलांना प्रोत्साहित करण्याच्या हेतूने अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



या अंतर्गत ३ डिसेंबर २०२४ रोजी दिव्यांगत्वाबाबत जनजागृतीकरिता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये नमुंमपा इटीसी केंद्रातील कर्मचारी, केंद्रातील विविध प्रवर्गातील दिव्यांग मुले व त्यांचे पालक तसेच सर्व शिक्षा अभियानांतर्गत कार्यरत कर्मचारी उपस्थित होते.

या रॅलीचा प्रारंभ सकाळी ९.३० वाजता इटीसी केंद्रामधून करण्यात आला. इटीसी केंद्र ते वाशी स्टेशन परिसर येथे रॅली आली असता मानवी साखळी करून दिव्यांगत्वाबाबत माहिती दर्शविणारे फलक व घोषणा याद्वारे दिव्यांगत्वाबाबत जनजागृती करण्यात आली. या रॅलीची सांगता पुन्हा इटीसी केंद्रामध्ये येऊन करण्यात आली. रॅलीनंतर दिव्यांग मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.

६ डिसेंबर २०२४ रोजी दीपाली खवले, असिस्टंट प्रोफेसर, डी. वाय पाटील युनिव्हर्ससिटी स्कूल ऑफ लॉ, नेरूळ यांनी दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ या विषयावर दिव्यांग मुलांच्या पालकांकरिता माहितीपूर्ण व्याख्यान दिले.

९ डिसेंबर २०२४ रोजी इटीसी केंद्राव्दारे दिव्यांग मुले, पालक व शिक्षक यांची नेरूळ येथील वंडर्स पार्क येथे भेट आयोजित करण्यात आली. वंडर्स पार्कमध्ये टॉय ट्रेन व इतर खेळाच्या साधनांचा दिव्यांग मुलांनी मनमुराद आनंद घेतला. या वेळी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कर्मचारी व त्यांच्या येथे शिकत असणाऱ्या दिव्यांग विदयार्थ्यांनाही या उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले होते. येथील लाईट अँड म्युझिक शो मुलांकरिता अतिशय आनंददायी होता.

डिसेंबर महिन्यात आयोजित विविध उपक्रमांत मुलांसाठीचा आवडीचा उपक्रम म्हणजे वेशभूषा स्पर्धा १३ डिसेंबर २०२४ रोजी घेण्यात आली. या वेळी दिव्यांग मुलांनी विविध प्रेरणादायी व्यक्तींच्या वेशभूषा धारण करून विविध संदेश दिले.

२३ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या ख्रिसमस पार्टीने या महिन्यातील विविध उपक्रमांची हसत खेळत सांगता झाली.हे सर्व कार्यक्रम अत्यंत शिस्तीबध्द रितीने नियोजनानुसार पार पाडण्यासाठी इटीसी केंद्रातील सर्व निमवैदयकीय कर्मचारी, विशेष शिक्षक व इतर कर्मचा-यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमांवर नियंत्रण व देखरेखीचे काम इटीसी केंद्रातील शैक्षणिक व्यवस्थापकांनी केले. सर्व कार्यक्रमांच्या आयोजनासाठी केंद्राच्या संचालिका उपायुक्त संघरत्ना खिलारे यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.



### किर्ती सिंग बनली सीए

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सीवूड्स सेक्टर ४८ ए प्रथमेश सोसायटी मधील रहिवासी स्व. मनोजकुमार सिंग यांची कन्या किर्ती मनोजकुमार सिंग हिने चार्टेड अकाउंट पदवी संपादन केली आहे.

किर्ती हिच्या घरचे २०२०मध्ये छत्र हरपल्यावर अतिशय प्रतिकूल स्थितीत आई मीरा यांनी घरात शिवणकाम व घरगुती ट्युशन घेऊन तसेच स्वतः किर्तीने घरगुती ट्युशन घेऊन आर्थिक स्थितीचा सामना केला आणि प्रतिकूल परस्थितीत छोट्याशा घरात सीए पदवीचा अभ्यास करून यश संपादन केले. तिच्या यशाचे स्थानिक भाजपचे माजी नगरसेवक भरत जाधव यांनी भेट देऊन अभिनंदन करीत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



### नवी मुंबईतील समस्या सोडवा -ॲड. आंबेडकर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी खासदार ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी नवी मुंबईतील नागरिकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ.केलास शिंदे यांची भेट घेतली. या भेटीला आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत समस्या त्वरित सोडवण्याचे आश्वासन दिले.

नवी मुंबईतील विविध नागरी समस्या ॲड प्रकाश आंबेडकर यांनी आयुक्त यांच्या बेलापूर येथील मुख्यालयात भेट घेतली. या भेटीत विविध ज्वलंत समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी केली. या वेळी झालेल्या भेटीत आयुक्त शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत समस्या तातडीने सोडवण्याचे आश्वासन ॲड. आंबेडकर यांना दिले. या वेळी वंचित बहुजन आघाडीचे दिलीप गायकवाड यांसह नवी मुंबईतील पदाधिकारी उपस्थित होते.

## जासई विद्यालयात पारितोषिक वितरण समारंभ

**उरण : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरुकुल प्रकल्प अंतर्गत विविध गुणदर्शन व पारितोषिक वितरण समारंभ झाला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जेएनपीएचे विश्वस्त रवी पाटील, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य सुधीर घरत, भारतीय मजूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील, उरण पंचायत समितीचे माजी सभापती नरेश घरत हे लाभले होते. विद्यालयाचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्था रायगड विभागाचे विभागीय अधिकारी कोंगेरे एम.के.यांनी प्रमुख पाहुण्यांचे विद्यालयाच्या वतीने हार्दिक स्वागत करून या कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले व पारितोषिक प्राप्त यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून विविध गुणदर्शन कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.



कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे चेअरमन अरुण जगे होते. रयत गुरुकुल प्रकल्पांतर्गत निबंध, वक्तृत्व, हस्ताक्षर, चित्रकला इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने शैक्षणिक साहित्य रुपी पारितोषिके देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले गेले तसेच रायगड विभागीय वक्तृत्व स्पर्धेत या विद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी यश संपादन केल्याबद्दल त्यांचाही मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास विद्यालयाचे व्हाईस चेअरमन डी.आर. ठाकूर, गोपीनाथ म्हात्रे, प्रभाकर मुंबईकर, सरपंच संतोष घरत,उद्योजक एकनाथ पाटील, मधुकर पाटील, मधुकर म्हात्रे, महादेव म्हात्रे, बाबुराव मढवी, माणिक म्हात्रे, रघुनाथ ठाकूर, डी.पी. सोनवणे, टी. टी.घरत, शकुंतला घरत, ग्रामपंचायत सदस्या जयश्री ठाकूर तसेच रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा



शेख या विद्यालयाचे माजी प्राचार्य अरुण घाग आणि विद्यार्थी, पालक, शिक्षण प्रेमी नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये सांस्कृतिक विभाग, पी.जे. घरत, एम.के. घरत, एस.पी. ठाकरे, एस.एस. शिंदे, डी.बी. म्हात्रे, एस.एस. पाटील आणि सर्व वर्गशिक्षक व सेवकांनी मोलाचे सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पी.जे. घरत व प्रा.अतुल पाटील यांनी केले.

## निवडक

### कायदेविषयक ज्ञानदान शिबिर



**रोहे :** येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. सी. डी. देशमुख वाणिज्य व के. जी. ताम्हाणे कला महाविद्यालयात तालुका विधी समिती रोहा व महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक ज्ञानदान शिबिर झाले. महाविद्यालयाचे १५९ विद्यार्थी सहभागी झाले होते. या कायदेविषयक ज्ञानदान शिबिराचे शिबीराचे अध्यक्षस्थान एस.एस.महाले, दिवाणी न्यायाधीश क. स्तर रोहा यांनी भूषविले. या शिबिरास प्राचार्य डॉ. अतुल साळुंके, राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा.तुळशिदास मोकल, डॉ. सुकुमार पाटील, प्रा. शत्रुघ्न लोहकरे, डॉ. कमलाकर कांबळे, प्रा. सिमा भोसले, प्रा. निकिता तांबे आदी उपस्थित होते. तर मार्गदर्शक म्हणुन ॲड. शितल सानप व ॲड. मनोज शिंदे उपस्थीत होते.

### डिकसळ येथे ख्रिसमस कार्निवल



**कर्जत :** तालुक्यातील डिकसळ येथे असलेल्या माजी सैनिक शिक्षण आणि स्वास्थ्य कल्याण संस्थेच्या डॅफोडिल्स इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी ख्रिसमस मार्केट कार्निवलचे आयोजन केले होते. यामध्ये १७५हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. ९५ हुन अधिक विद्यार्थ्यांनी स्टॉल्स लावले होते. यामध्ये गेम झोन, फुड स्टॉल, फोटोशूट, सेल्फी पॉईंट, फुड स्टॉलमध्ये अनेक खाद्यपदार्थ विद्यार्थ्यांनी या विक्रीसाठी आणले होते. या वेळी शाळेच्या मुख्याध्यापिका आरती सावंत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या ख्रिसमस कार्निवलचे आयोजन केले होते.

### गोल्डन ग्रुपच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन



**माणगाव :** गोल्डन ग्रुप वावेदिवाळी यांनी सन २०२५ च्या दिनदर्शिकेचे प्रकाशन हे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते इंदापूरमध्ये करण्यात आले. या प्रकाशन सोहळ्याला राष्ट्रवादी रायगड जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे, उपाध्यक्ष शेखर देशमुख, महाराष्ट्र युवक सचिव दीपक जाधव, तालुका अध्यक्ष काका नवगणे, जिल्हा चिटणीस उदय अधिकारी, माजी उपसरपंच समीर मेथा, बाळा खातू तसेच वावेदिवाळीतील ज्येष्ठ नागरिक गोपाळ कदम, राजेंद्र कदम, विजय कदम, प्रकाश कदम, पांडुरंग कदम, संतोष कदम, स्वप्नील जाधव, यशवंत मोरे, गोल्डन ग्रुपचे अध्यक्ष संदीप कदम, राजेश कदम, पुंडलिक कदम, श्रीकांत कदम आदी उपस्थित होते.



**नागोठणे : साई सेवक मित्र मंडळाच्या वतीने श्री साई पालखी पदयात्रा सोहळा यशस्वीरित्या झाल्यानंतर बुधवारी रात्री ग्रामदैवत श्री जोगेश्वरी मंदिर प्रांगणात साई भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.** (छाया : शामकांत नेरपगार)

### सुधागडात गरजूंना ब्लँकेटचे वाटप

**पाली :** कै. वसंतराव ओसवाल यांच्या जयंतीनिमित्त २५ डिसेंबर रोजी सुधागडातील गोरगरीब जनतेला ब्लँकेट चे वाटप करण्यात आले. यामध्ये सुधागड तालुक्यातील कळंब, वाघोशी, नेणवली, घोटावडे, भाऊशेत, वाफेघर, भार्जे, गोकुळपाडा, खांडपोली, मानखोरा, पावसाळा इतर अनेक आदिवासीवाडीतील गोर–गरीब ग्रामस्थ जनतेला साधारण ६०० ब्लँकेटचे वाटप त्या त्या गावातील सरपंच, उपसरपंच, सामाजिक कार्यकर्ते यांच्या हस्ते करण्यात आले. कै. वसंतराव ओसवाल यांची मुलगी गीता पालरेचा यांच्या सहकार्याने व संपूर्ण ओसवाल कुटुंबियांच्या उपस्थितीत अनेक गावातील गोर–गरीब जनतेला मोठ्या प्रमाणात ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.



# माथेरानमध्ये नेटवर्क प्रॉब्लेम

## नवीन टॉवर उभारण्याची व्यापाऱ्यांची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळी मोबाईल नेटवर्कची समस्या अनेक वर्षांपासून आहे. कोणत्याही प्रकारच्या मोबाईल सिम कार्डला नेटवर्क नसल्याने पर्यटकांची व स्थानिक नागरिकांची गैरसोय होत आहे. माथेरान शहरात नवीन नेटवर्क टॉवर उभा करावा, अशी मागणी होत असून माथेरान व्यापारी वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या कडे नवीन टॉवर उभा करावा अश्या आशयाचे पत्र पाठविण्यात आले आहे.




जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान मध्ये वर्षाकाठी लाखोंच्या संख्येने पर्यटक याठिकाणी भेट असतात. तसेच संपूर्ण देशभरात कॅशलेस व्यवहार होत असल्याने बहुतांशी पर्यटक ऑनलाईन व्यवहार करणे पसंत करतात, मात्र माथेरान पर्यटनस्थळी सध्या नेटवर्क सुविधा सुरळीत नसल्याने पर्यटकांची गैरसोय होत आहे. नेटवर्क सुविधा सुरळीत नसल्याने बँकेचे व्यवहार करताना स्थानिकांना आणि व्यापारी वर्गाला देखील समस्यांचा सामना करावा लागत आहे. याचाच विपरीत परिणाम येथील पर्यटनावर पण होत आहे.

मागील काळात टाटा, एअरटेल, ओडाफोन या कंपन्यांचे नेटवर्क टॉवर होते, मात्र काही महिन्यांपूर्वी हा टॉवर काढण्यात आला. त्यामुळे आता पर्यटकांना माथेरान मध्ये अनेक ठिकाणी कॅशलेस व्यवहार करताना मोठ्या प्रमाणावर नेटवर्क प्रॉब्लेम येत आहे. पर्यटकांना होत असलेल्या त्रासामुळे येथील माथेरान व्यापारी वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने माथेरान शहरात नवीन मोबाईल नेटवर्क टॉवर उभे करावे अश्या आशयाचे निवेदन नगरपालिकेत देण्यात आले आहे तसेच त्याची एक प्रत जिल्हाधिकारी यांच्या कडे सुद्धा पाठविण्यात आली असल्याचे व्यापारी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष राजेश चौधरी यांनी सांगितले.

लवकरात लवकर या टॉवरची उभारणी केल्यास या ठिकाणी नेटवर्क अभावी होत असलेल्या त्रासातून येथील स्थानिक नागरिकांची आणि पर्यटकांना सुटका होऊन पर्यटकांची संख्या द्विगुणीत होईल.

## गोमांस वाहतूकप्रकरणी तीन आरोपींच्या आवळल्या मुसक्या

**पेण : प्रतिनिधी**

पेण पोलीस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम तसेच मोटार वाहन अधिनियम कलमा नुसार गोमांसाची वाहतुक प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

याबाबत पोलिसांकडून तपास सुरू असताना पोलिसांनी गुन्हयातील टेम्पो (एमएच ०५ एफ जे १५११) मध्ये ६,९८,०० रुपये किंमतीचे ३४९० किलोग्रॅम वजनाचे गो वंशीय जनावरांचे मांस तसेच तीन लाख रूपये किंमतीचा टेम्पो जप्त करण्यात आला होता.




पोलीस अधीक्षक रायगड सोमनाथ घार्गे व अपर पोलीस अधीक्षक यांच्या सुचनांप्रमाणे तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी गजानन टोम्पे व पोलीस निरीक्षक संदिप बागुल यांनी केलेल्या मार्गदर्शनाप्रमाणे पेण पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक समद बेग तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अंमलदार या गुन्हयाचा अधिक तपास करत होते.

या वेळी टेम्पो मालक साजीद लायक कुरेशी, कुर्ला, मुंबई असे असल्याचे समजुन आल्याने गुन्हयातील आरोपी अफसर मेहबुब कुरेशी (वय ३९), नजरूद्दिन निजामुद्दिन खान (वय ४८), साजीद लायक कुरेशी (वय ४३, रा. रूम नं., सर्व रा. कुर्ला पुर्व मुंबई) यांची माहिती घेउन चौकशी अंती त्यांचा गुन्हयात सहभाग असल्याची खात्री झाली. यानंतर त्यांना अटक करण्यात आली. त्यांची २६ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आले आहे. गुन्हयातील सहभागी अधिक आरोपीत यांचा शोध घेण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे.

## रोह्यात अटलबिहारी वाजपेयींची जयंती

### भाजप पदाधिकाऱ्यांनी केले काव्यवाचन



**धाटाव : प्रतिनिधी**

दिगवंत भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती रोहा तालुका भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी सुशासन दिन म्हणून बुधवारी (दि.२५) रोहा भाजप कार्यालयात जयंत साजरी करण्यात आली.

अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तर या वेळी अमित घाग, रोशन चाफेकर, कृष्णा बामणे यांनी अटलबिहारी वाजपेयी यांच्याबद्दल मनोगत व्यक्त केले तसेच अनिल घरजाळे यांनी त्यांची कविता बोलून त्यांना अभिवादन केले.

या वेळी रोहा तालुका अध्यक्ष अमित घाग, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर, रोहा तालुका सरचिटणीस कृष्णा बामणे, भाजपा जिल्हा चिटणीस श्रद्धा घाग, ज्येष्ठ महिला मोर्चा पदाधिकारी सीमा कोनकर, जिल्हा युवा वॉरियर संयोजक वैभव कुळकर्णी, युवा मोर्चा रोहा शहर अध्यक्ष अनिल घरजाळे, महिला मोर्चा रोहा तालुका सरचिटणीस रिया कासार, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस निलेश धुमाळ, रोहा शहर युवा मोर्चा सरचिटणीस सुमित रिसबुड, रोठचे बुथ अध्यक्ष सचिन मोरे, हर्ष पाटील, दिपेश पवार, राज कासार यासह भाजपचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते उपस्थित होते.

## अन्वी गुंडकडून मातीविना शेती

### ◆ तालुकास्तरीय प्रदर्शनात पटकावला प्रथम क्रमांक

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने जिंदाल विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले होते. यामध्ये रा.जि.प. आदर्श शाळा मजगाव मराठी शाळेची अन्वी उमेश गुंड व तिची सहाध्यायी अनुश्री अशोक पाटील हिने माती विनाशेती हा प्रकल्प केला होता. तिने या प्रदर्शनात प्रथम क्रमांक पटकाविला आहे.

सहावी ते आठवीच्या दिव्यांग गटातून, रा.जि.प. आदर्श शाळा मजगांव मराठी शाळेची अन्वी उमेश गुंड व तिची सहाध्यायी अनुश्री अशोक पाटील हिने माती विना शेती हा प्रकल्प केला होता. या प्रकल्पास जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी पुनिता गुरव व सुनील गवळी गटशिक्षणाधिकारी



यांनी प्रत्यक्ष भेट देवून शाबासकीची थाप दिली.

अन्वीने साकारलेल्या प्रकल्पाची, दमदार आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी दखल घेवून प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल सन्मानचिन्ह व प्रमाणपत्रदेवून तिचा सत्कार केला. या सत्कारावेळी तालुक्याचे गटविकास अधिकारी खताळ, गटशिक्षणाधिकारी सुनिल गवळी मुरूडचे प्रशासन अधिकारी दीपाली दिवेकर, बीट विस्तार अधिकारी नरेंद्र गुरव केंद्रप्रमुख महेश कवळे, जितेंद्र मकू, दिनेश म्हात्रे, संजय झिराडकर, राजेश भोईर, गालिब उलडे , आदर्श शिक्षक देवानंद गोगर, जगदिश चवरकर व राजेंद्र नाईक, मुख्याध्यापक हेमकांत गोयजी, हेमंत नांदगावकर आदी उपस्थित होते.

## मुरूड समुद्रकिनारी बैलगाडी शर्यतीचा थरार

### पर्यटकांना होतोय त्रास



**मुरूड : प्रतिनिधी**

सद्या मुरूड, काशीद व नांदगाव समुद्रकिनारे गर्दीने भरलेले आहेत. नाताळ सणाची मुंबई व ठाणे शहरातील शाळांना दोन आठवड्याच्या सुट्ट्या लाभल्याने असंख्य पर्यटक समुद्रकिनारी आलेले आहेत.

नाताळ सुट्टचांच्या निमित्ताने कोकणातील समुद्रकिनारी पर्यटकांची संख्या वाढत असताना दुसरीकडे स्थानिकांच्या हौसेपोटी पर्यटकांची त्रेधातिरपीट होत असल्याचे चित्र मुरूड समुद्रकिनारी समोर आले आहे. मुरूड समुद्रकिनारी स्थानिकांकडून सकाळच्या सुमारास बैलगाडा शर्यतींसाठी सराव केला जातो आहे. कुटुंबियासोबत, ज्येष्ठ, लहानग्यांची या बैलगाड्यांच्या ताफ्यातून जीव वाचवताना त्रेधातिरपीट होते आहे. या थरकाप उडवणाऱ्या शर्यतींच्या सरावावर आता पर्यटक संताप व्यक्त करत आहेत. पर्यटन महत्वाचे की हौस असा प्रश्न आता मुरूडमध्ये येणारे पर्यटक विचारत आहेत. सोमवारी एका पर्यटक कुटुंबाने याबाबतचा व्हिडिओ रेकॉर्ड केला आहे.

आठ ते दहा बैलगाड्या एकाच वेळी समुद्र किनारी पळवल्या जातात. या बैलगाड्यांसोबत स्थानिकांच्या तितक्याच वेगाने दुचाकी पळत असतात. या दुचाकी बैलगाड्यांच्या पुढे आणि तीनही बाजूंना असतात. पर्यटक आणि मार्गात येणाऱ्या प्रत्येकाला तातडीने हटवण्यासाठी जोरजोराने हॉर्न आणि शिट्या वाजवल्या जातात. त्यामुळे पर्यटकांना आपल्या साहित्य आणि लहान मुलांसह ज्येष्ठांनाही सुरक्षित स्थळी धाव घ्यावी लागते. त्यामुळे पर्यटकांमध्ये भीती निर्माण झाली आहे.

बैलगाडी शर्यतीचा सद्या पेव फुटले असून आपली बैल गाडी सर्वप्रथम येण्यासाठी बैलगाडी चां सराव समुद्र किनारी केला जातो. परंतु हा सराव म्हणजे पर्यटकांची घाबरगुंडी उडत आहे. जीव मुठीत घेऊन बाजूला हटावें लागत आहे. पर्यटक यांच्या सोबत पत्नी व लहान मुले असतात अश्यावेळी बाजूला हटने खूप महत्वाचे असते. खूप सावधगिरी बाळगून पर्यटक यांना आपली सुरक्षितता राखावी लागत आहे.

सराव करतेवेळी कोणतीही कलपना पर्यटकांना नसते, परंतु अचानक पने येणाऱ्या बैलगाडी पासून सुरक्षित अंतर ठेवणे खूप जिक्रीचे बनते. सुदैवाने आतापर्यंत कोणतीही दुर्घटना घडलेली नाही, परंतु सावधगिरी सुधा हौसी बैलगाडी धारकांनी बाळगली तर सर्वांच्या हिताचे ठरणार आहे. शेवटी प्रत्येकाला स्वतःचा जीव खूप महत्वाचा आहे. पर्यटकांची सुरक्षितता पाहून हा बैलगाडी सराव करण्यात यावा, अशी असंख्य पर्यटकांनी मागणी केली आहे.

## उसर हायस्कूलचे स्नेहसंमेलन

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील छत्रपती शिक्षण मंडळाचे अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द या विदयालयात मंगळवारी (दि.२४) वार्षिक स्नेहसंमेलन विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरे करण्यात आले.

सकाळी १० वाजता स्नेहसंमेलनाचे उद्घाटन होऊन आनंद बाजाराचे उद्घाटन चरई अध्यक्ष सुचित पतारे व जगदिश घाट्वाल यांच्या हस्ते झाले. पारितोशिक वितरण समारंभात ॲड. निलेश रातवडकर यांच्या हस्ते अविष्कार या हस्तलिखीताचे प्रकाशन झाले.

दुसरे अतिथी सुबोध् जाधव यांच्या हस्ते पंचक्रोशी तील प्राथमिक शाळेस, विद्यालयास डीजीटल बोर्डचे वितरण करण्यात आले. प्रमुख वक्ते श्रीनिवास वारखंडकर यांनी पर्यावरण संतुलन कसे राखावे, प्लास्टिक टाळा हे सांगितले.

सुत्रसंचालन शिक्षक दिपक गुजर व विद्यार्थिनींनी केले तर प्रास्ताविक शिक्षक गावीत यांनी केले. मुख्याध्यापक व कार्यक्रमाचे अध्यक्ष नागनाथ सुर्वे यांनी सर्वांचे आभार मानले.



## पाली येथील राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत ‘ब्रह्मपुत्रा’ अव्वल

**पाली : प्रतिनिधी**

प्रकाश देसाई सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान वतीने पालीत आयोजित भव्य राज्य स्तरीय एकांकिका स्पर्धेत ब्रह्मपुत्रा एकांकिका अव्वल ठरली आहे. मंगळवारी (दि.२४) रात्री या स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ पेण सुधागड मतदार संघाचे आमदार रविंद्र पाटील, सिने अभिनेते प्रशांत दामले, प्रकाश भाऊ देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.



सलग सहा दिवस चाललेल्या या या एकांकिका स्पर्धेत राज्यातील तब्बल २७ नाट्य संस्थांनी सहभाग घेऊन दर्जे दार सादरीकरण करून नाट्य रसिकांना मंत्रमुग्ध केले. पारितोषिक वितरण निमित्त एका लग्नाची पुढची गोष्ट या नाटकाचा ७२९ नाटक प्रयोग झाला. तर सर्वात जास्त नाट्य प्रगोग ज्यांनी केले आहेत असे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डर प्रशांत दामले यांनी त्यांचा १३७८८ वा नाट्य प्रयोग पाली येथे केला.

या वेळी आमदार रविशेठ पाटील, शिवसेना रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश देसाई, भाजपा रायगड जिल्हा सरचिटणीस गिता पालरेचा, भाजप महाराष्ट्र प्रदेश सदस्य राजेश मपारा, भाजपा रायगड जिल्हा उपाध्यक्ष अलाप मेहता, उपविभागीय पोलिस अधिकारी रविंद्र चौंडकर, सु.ए.सो.चे उपाध्यक्ष रविंद्र लिमये, भाजपा महाराष्ट्र प्रदेश सदस्य राजेश मपारा, सु.ए.सो. संचालिका शिल्पा लिमये, सु.ए.सो. संचालिका ज्योत्स्ना प्रकाश देसाई, तहसिलदार उत्तम कुंभार, पाली पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सुधागड तालुका अध्यक्ष संदेश शेवाळे, प्रतिष्ठानचे युवा नेतृत्व हर्ष प्रकाश देसाई आदी उपस्थित होते.

# भारताचा पहिला डाव गडगडला

## मेलबर्न कसोटीत दुसऱ्या दिवसाअखेर ५ बाद १६४ धावा



**मेलबर्न : वृत्तसंस्था**

मेलबर्न बॉक्सिंग डे कसोटी सामन्यातील दुसऱ्या दिवसाअखेर भारतीय संघाने पाच विकेट्सच्या मोबदल्यात १६४ धावा केल्या असून टीम इंडिया अजूनही ३१० धावांनी पिछाडीवर आहे. ऋषभ पंत ६, तर रवींद्र जडेजा ४ धावांवर खेळत असून तिसऱ्या दिवशी या जोडीकडून दमदार भागीदारीची अपेक्षा आहे.

बॉक्सिंग डे कसोटीच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ४७४ धावांवर आटोपल्यावर भारतीय संघाने आपल्या पहिल्या डावाची सुरुवात केली. रोहित शर्मा आणि यशस्वी जैस्वाल यांचा बदललेला प्रयोग अपयशी ठरला. संघाच्या धावफलकावर अवघ्या ८ धावा असताना रोहित ३ धावा करून माघारी फिरला. पहिली विकेट गमावल्यावर लोकेश राहुल बॅटिंगला आला. त्याने यशस्वीच्या साथीने दुसऱ्या विकेटसाठी ४३ धावांची भागीदारी रचली. पहिल्या दोन्ही विकेट्स पॅट कमिन्सने घेतल्या.

पहिल्या धक्क्यातून सावरत यशस्वी जैस्वाल आणि विराट कोहलीने संघाचा डाव सावरला. या दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १०२ धावांची दमदार भागीदारी रचली. या जोडीसमोर ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी अक्षरशः खांदे टाकले होते, पण दोघांच्यातील ताळमेळ ढासळला अन् भारताच्या डावातील ४१व्या षटकात यशस्वी धावबाद झाला. त्याने ११८ चेंडूंचा सामना करताना ८२ धावांची खेळी केली.

यशस्वी बाद झाल्यावर विराटही ८६ चेंडूत ३६ धावा करून माघारी फिरला. नाईट वॉचमनच्या रूपात आलेल्या आकाशदीपलाही खाते उघडता आले नाही. परिणामी दिवसाअखेर भारतीय संघाचा अर्धा संघ अवघ्या १६४ धावांत तंबूत परतला आहे.

तत्पूर्वी स्टीव्ह स्मिथने सलग दुसऱ्या कसोटीत शतक झळकावून ऑस्ट्रेलियाला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेले. त्याने आपले ३४वे कसोटी शतक झळकावून लिटल मास्टर सुनील गावस्कर यांची बरोबरी केली. भारताविरुद्ध सर्वाधिक ११ कसोटी शतके झळकावणारा फलंदाज ठरला आहे.

### फॉलोऑन टाळण्यासाठी २७५ धावांची गरज

*फॉलोऑन वाचवण्यासाठी भारताला २७५ धावा कराव्या लागतील. आता टीम इंडियाला फॉलोऑन टाळण्यासाठी अजून ११० धावांची गरज आहे. तसे न झाल्यास ऑस्ट्रेलियन संघ भारताला डाव संपताच दुसऱ्या डावात प्रथम फलंदाजी करण्यासाठी पाचारण करू शकतो. ब्रिस्बेनमध्ये भारताच्या १०व्या आणि ११व्या क्रमांकाच्या खेळाडूंनी म्हणजेच आकाशदीप आणि बुमराहने भारताचा फॉलोऑन टाळला होता. आता मैदानावर ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजाची जोडी आहे.*

# यशस्वीचे शतक हुकले, तरीही केला खास पराक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्ध मेलबर्न कसोटीच्या दुसऱ्या दिवशी भारताने पाच विकेट गमावून १६४ धावा केल्या आहेत. यादरम्यान टीम इंडियाच्या पहिल्या डावात यशस्वी जयस्वालने दमदार खेळी केली. त्याने ११८ चेंडूंचा सामना करत ८२ धावा केल्या. यशस्वी शतक झळकावण्यास हुकला, पण त्याने एक खास विक्रम मोडला. यशस्वीने क्रिकेटचा देव सचिन तेंडुलकरला एका बाबतीत मागे टाकले आहे.

यशस्वीने आपल्या खेळीत ११ चौकार आणि एक षटकार मारला. या दरम्यान त्याने ८२ धावा केल्या. चुकीच्या कॉलमुळे तो धावबाद झाला. असे असले तरी यशस्वीने आपल्या खेळीने चमत्कार केला आहे. भारतासाठी एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत

### सचिन, विश्वनाथला टाकले मागे



त्याने सचिन तेंडुलकरला मागे सोडले. यासोबतच गुंडाप्पा विश्वनाथनही मागे राहिला. विश्वनाथने एका कॅलेंडर वर्षात १९७९मध्ये १३८८ धावा केल्या होत्या. सचिनने २००२मध्ये १३९२ धावा केल्या होत्या.

यशस्वीने २०२४मध्ये १३९४ धावा केल्या आहेत. त्याने आता सचिनला मागे टाकले आहे. या यादीत वीरेंद्र सेहवाग पहिल्या क्रमांकावर आहे. सेहवागने २०१०मध्ये १५६२ धावा केल्या होत्या.

**दमदार कारकीर्द**

यशस्वीची कसोटी कारकीर्द आतापर्यंत उत्कृष्ट राहिली आहे. त्याने १८ सामन्यांच्या ३३ डावात १६८२ धावा केल्या आहेत. या दरम्यान त्याने चार शतके आणि नऊ अर्धशतके झळकावली आहेत. यशस्वीचा कसोटीतील सर्वोत्तम धावसंख्या २१४ धावा आहे. त्याने टीम इंडियासाठी २३ टी-२० सामनेही खेळले आहेत. यात त्याने एक शतक आणि पाच अर्धशतके झळकावली आहेत. त्याने झटपट प्रकारात एकूण ७२३ धावा केल्या आहेत.





## पनवेलमधील ओवळे येथे आमदार चषक क्रिकेट स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील ओवळे येथे आर्या स्पोर्टस्च्या वतीने सरपंच रूपेश सुरेश गायाकवाड यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आमदार चषक २०२४ ही क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले, तर या स्पर्धेला आमदार प्रशांत ठाकूर यांनीही भेट देत शुभेच्छा दिल्या.

या वेळी कोळी समाजाचे नेते विश्वानाथ कोळी, रायगड टेनिस ग्रामीण असोसिएशनचे अध्यक्ष राकेश गायकवाड, उपाध्यक्ष प्रशांत खानावकर, मनखुश नाईक, माजी सरपंच गजानन पाटील, नंदराजशेठ मुगांजी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.

## आजपासून कुमार-कुमारी गट राज्य निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

**सांगली : प्रतिनिधी**

५१व्या कुमार-कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेला शनिवार (दि. २८)पासून सांगली सांगलवाडी येथील चिंचबाग मैदानावर प्रारंभ होईल. स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ८.३० वाजता करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने सांगली जिल्हा कबड्डी असोसिएशनने युवक मराठा क्रीडा संस्था यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

पिंपरी-चिंचवड विरुद्ध पालघर, यजमान सांगली विरुद्ध उस्मानाबाद या कुमारी गटाच्या उद्घाटनीय सामन्यांबरोबरच अन्य चार सामन्यांनी स्पर्धेस सुरुवात होणार आहे. स्पर्धा मातीच्या सहा क्रीडांगणावर खेळविण्यात येणार आहे. सामने सकाळ व सायंकाळ या दोन्ही सत्रात होतील.

## सिहान राजू कोळी यांना ब्लॅकबेल्ट प्रदान

**उरण : बातमीदार**

गोशीन-रियु कराटे फेडरेशन मलेशिया आयोजित कराटे स्पर्धा, ब्लॅकबेल्ट परीक्षा व पंच परीक्षा व चार दिवसांचे शिबिर नुकतेच मलेशियात झाले. यामध्ये सिहान राजू गणपत कोळी यांनी वयाच्या ६१व्या वर्षी सहावी डिग्री ब्लॅकबेल्ट परीक्षा तसेच पंच परीक्षाही उत्तीर्ण केली.



राजू कोळी हे गोशीन-रियु कराटे असोसिएशन इंडियाचे अध्यक्ष आहेत. त्यांना सिहान वसंतन के व इतरांनी मार्गदर्शन व सहकार्य केले, तर कोळी, गोपाळ म्हात्रे व राकेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली रोहित शरद घरत याने स्पर्धेत कांस्यपदक पटकावले. कोळी व घरत यांचे अनेकांनी अभिनंदन केले.



## चिंचपाडा येथे मैदानाचे उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधून भारतीय संघात खेळणारे खेळाडू घडावेत, अशी इच्छा डॉ. संतोष जाधव यांनी व्यक्त केली. ते काळभैरव चिंचपाडा येथील प्रतिक अकादमीच्या मैदान उद्घाटन समारंभात बोलत होते.

उद्घाटन समारंभास माजी सरपंच शशिकांत भोईर, हरिष केणी, श्याम पाटील, प्रल्हाद केणी, अनिल केणी, अंकल बहिरा, प्रतिक अकादमीचे प्रशिक्षक प्रतिक मोहिते यांच्यासह खेळाडू व पालक उपस्थित होते.

डॉ. जाधव पुढे म्हणाले की, सध्या खेळण्यास मैदान मिळणे दुरापास्त झाले आहे. चिंचपाडा ग्रामस्थांनी प्रतिक क्रिकेट अकादमीसाठी हे मैदान उपलब्ध करून दिले ही अभिमानास्पद बाब आहे. या मैदानात उच्च दर्जाचे प्रशिक्षण दिले जाईल अशी अपेक्षा आहे.

## रायगड जिल्हा कुस्ती अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे रायगड जिल्हा व तालुका कुस्तीगीर संस्था व हनुमान तालीम संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कुस्ती अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा शनिवारी (दि. २९) आयोजित करण्यात आली आहे.

वाडगाव येथील खासदार सुनील तटकरे कुस्ती प्रशिक्षण केंद्र येथे दुपारी २ वाजता या निवड चाचणी स्पर्धेस प्रारंभ होणार असून तत्पूर्वी सकाळी ९ ते १२ या दरम्यान वजने घेतली जातील, असे रायगड जिल्हा कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष जयेंद्र भगत यांनी कळविले आहे. या वेळी विविध वयोगट व प्रकारांनुसार कुस्ती खेळवून खेळाडूंची निवड होणार आहे.



**दार्जिलिंग (प. बंगाल) : सिलीगुडी येथे झालेल्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत अलिबाग तालुक्यातील पेढांबे येथील सृष्टी प्रवीण पाटील हिने सुवर्णपदकासह स्ट्राँग वूमन म्हणून किताब मिळवला. याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.**

## ऑस्ट्रेलियन चाहत्यांनी काढली विराटची छेड

### संतापलेल्या कोहलीचा व्हिडीओ व्हायरल



**मेलबर्न : वृत्तसंस्था**

सध्या जारी बॉर्डर-गावसकर ट्रॉफीमध्ये विराट कोहलीचा फॉर्म फारसा चांगला राहिलेला नाही. एकीकडे तो बॅटने फ्लॉप होत असताना तो मैदानावर ऑस्ट्रेलियाचा युवा सलामीवीर सॅम कोन्स्टासला भिडला. या घटनेनंतर विराट ऑस्ट्रेलियन चाहत्यांच्या निशाण्यावर आहे. आता एक व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ऑस्ट्रेलियन चाहते त्याला बाद झाल्यानंतर चिडवत आहेत आणि नंतर विराट संतापलेला दिसतोय.

मेलबर्न कसोटीत भारताच्या पहिल्या डावात विराट कोहली बाद झाल्यानंतर पॅव्हेलियनमध्ये परतत असताना ही घटना घडली. ऑस्ट्रेलियन प्रेक्षकांनी छेड काढल्यावर विराट संतापला. त्याचा राग एवढा होता की तो थेट प्रेक्षकांचा सामना करण्यासाठी सज्ज झाला.

व्हिडीओमध्ये दिसतंय की, ऑस्ट्रेलियन चाहते कोहलीला चिडवत करत होते. दरम्यान, गर्दीत उपस्थित काहींनी विराटला असे काही तरी म्हटले, जे त्याला आवडले नाही. ते ऐकून विराट पॅव्हेलियनच्या अर्ध्या वाटेवरून परत येतो आणि गर्दीत कोण काय बोलतोय ते पाहू लागतो. विराट बाहेर येताना पाहून एक व्यक्ती त्याला परत आत घेऊन जाते.

## स्टीव्ह स्मिथने मोडला सचिन-विराटचा विक्रम

**सिडनी : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉक्सिंग डे कसोटीच्या दुसऱ्या दिवशी स्टीव्ह स्मिथने मोठा पराक्रम केला आहे.



स्मिथने टीम इंडियाविरुद्ध पहिल्या दिवशी दमदार सुरुवात केल्यानंतर दुसऱ्या दिवशी शतक झळकावले. यासह तो बॉर्डर-गावसकर ट्रॉफीच्या इतिहासात विराट आणि सचिनला मागे टाकत सर्वाधिक १० शतके झळकावणारा पहिला खेळाडू ठरला आहे.

स्मिथने मेलबर्न बॉक्सिंग डे कसोटी सामन्यात १४० धावांची महत्त्वपूर्ण खेळी साकारली. या सामन्यात शतक झळकावताच त्याने बॉर्डर-गावसकर ट्रॉफीत सचिन तेंडुलकर आणि विराट कोहली यांचा नऊ शतकांचा विक्रम मोडला. स्मिथ, सचिन, विराटनंतर रिकी पॉंटिंग आठ व मायकेल क्लार्क याने सात शतके केली आहेत. स्मिथच्या कारकिर्दीतील हे ३४वे शतक असून त्याने कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात वेगवान ३४ शतके झळकावली आहेत.

## हार्दिक पांड्या विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळणार

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेआधी भारताचा क्रिकेटपटू हार्दिक पांड्या वनडे सामना खेळण्यासाठी तयार झाला आहे. विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत तो बडोदा संघाकडून मैदानात उतरणार आहे. वैयक्तिक कारणास्तव देशांतर्गत वनडे स्पर्धेतील पहिल्या काही सामन्यासाठी तो संघाला जॉईन झाला नव्हता, पण आता तो पुन्हा एकदा वनडे मॅच खळण्यासाठी तयार आहे.

हार्दिक पांड्याने अखेरचा वनडे सामना १९ ऑक्टोबर २०२३ रोजी वनडे वर्ल्डकप स्पर्धेदरम्यान खेळला होता. दुखापतीमुळे त्याच्यावर वनडे वर्ल्डकप स्पर्धेतून माघार घेण्याची वेळ आली होती. मिनी वर्ल्डकप अर्थात चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेच्या दृष्टीने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत वनडे खेळण्याचा निर्णय हार्दिकसाठी फायद्याचा ठरू शकतो.

विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत हार्दिक पांड्या बाद फेरीतील सामन्यात खेळताना दिसेल, अशी बातमी चर्चेत होती, पण आता चौथ्या फेरीतील बंगालविरुद्धच्या सामन्यात तो खेळणार असल्याचे स्पष्ट



झाले आहे. २८ डिसेंबरला बडोदा आणि बंगाल यांच्यातील लढत रंगणार आहे. या सामन्यात हार्दिक पांड्या हा भाऊ क्रुणाल पांड्याच्या नेतृत्वाखाली मैदानात उतरेल. वर्षभरानंतर वनडे मॅच खेळताना ३१ वर्षीय हार्दिक कशी छाप सोडणार याकडे सर्वांच्या नजरा असतील.

हार्दिक पांड्या वनडेपासून दूर असला तरी टीम इंडियाकडून तो टी-२० क्रिकेटच्या मैदानात सातत्याने खेळताना दिसला आहे. दक्षिण आफ्रिका दौऱ्यातही तो सूर्यकुमारच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा भाग होता. त्यानंतर सैयद मुश्ताक अली ट्रॉफी स्पर्धेत तो बडोदा संघाकडून मैदानात उतरला होता. देशांतर्गत स्पर्धेत बॅटिंग बॉलिंगमध्ये धमक दाखवत त्याने संघाला सेमी फायनलपर्यंत नेण्यात महत्त्वाची भूमिकाही बजावली होती. या स्पर्धेतील सात सामन्यात त्याने २४६ धावा केल्या होत्या. याशिवाय सहा विकेट्सही त्याने घेतल्याचे पाहायला मिळाले होते.

**चॅम्पियन्स ट्रॉफीची तयारी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ऑफ सीझनमध्ये भारतीय खेळाडूंनी देशांतर्गत क्रिकेटमध्ये सहभागी व्हावे, अशा सूचना दिल्या आहेत. या नियमाचे हार्दिक पांड्या पालन करत आहे. विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत छाप सोडून तो चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेसाठी टीम इंडियातील आपली दावेदारी पक्की करण्यासाठी प्रयत्नशील असेल.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार [illegible] मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक रा[illegible] अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com